


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ७३ * नांदेड * बुधवार, दि. १८ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# वादळी चर्चेनंतर विधानपरिषदेततही धर्म स्वातंत्र्य विधेयक मंजूर

**मुंबई (प्रतिनिधी)–** धर्मपरिवर्तन करण्यापूर्वी ६० दिवस नोटीस देणे अपेक्षित आहे, हा नियम कशासाठी तर धर्मांतर बळजबरीने तर होतं नाही ना याची खात्री करण्यासाठी हा नियम आहे. विरोधक आम्हाला विचारत आहेत की, आकडेवारी आहे का? तर त्यांना सांगणं आहे की जिथं कायदा नाही तिथं तुम्ही आकडेवारी कुठून आणणार असे म्हणत गृहराज्यमंत्री पंकज भोईर यांनी विधानपरिषदेत धर्म स्वातंत्र्य विधेयकावर उत्तर दिले. विधानसभेनंतर विधानपरिषदेत देखील धर्म स्वातंत्र्य बिल मंजूर करण्यात आले. त्यामुळे, लवकरच महाराष्ट्रात धर्म स्वातंत्र्याचा कायदा होणार असून ७ वर्षांच्या शिक्षेची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे.

मंत्री पंकज भोईर यांनी विधानसभेत धर्म स्वातंत्र्य विधेयक मांडल्यानंतर सभागृहात गेल्या आठवड्यात विधेयकावर चर्चा झाली. त्यानंतर, काल आणि आज गेल्या विधान परिषदेत दोन्ही बाजुने विधेयकावर चर्चा झाली. अखेर, विधानसभेनंतर विधानपरिषदेतही हे विधेयक बहुमताच्या जोरावर मंजूर झाले. त्यानंतर, आजच कामकाज स्थगित करण्यात आलं आहे. बुधवारी सकाळी १० वाजता सभागृह सुरू होईल.

पंकज भोईर यांनी बोलताना म्हटले की, धर्मांतर झाल्याची २९ प्रकरणे प्रसाद लाड यांनी समोर आणली. समाजात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर अन्याय झाला तर सक्षमपणे गुन्हा दाखल करता यावा याची दखल विधेयकात घेतली आहे. बेकायदेशीर धर्मांतरला विरोध करण्यासाठी हा कायदा आहे, असेही भोईर यांनी म्हटलं. विधानपरिषदेत आज या विधेयकावर जोरदार चर्चा झाली. शिवसेना ठाकरे गटानेही विधेयकास पाठिंबा दिला, मात्र अनिल परब यांनी जोरदार भाषण केलं.

मी बिलाला समर्थन करणार आहे मात्र त्यातील काही बाबींचा उलगडा होणे गरजेचे आहे. हे बिल पक्षांतर बिल आहे की धर्मांतर बिल आहे? कारण पक्षांतर्गत बिलामध्ये ज्या बाबी समाविष्ट होत्या, त्या सगळ्या बाबी या बिलामधे समाविष्ट आहेत. फसवू नये, लाडीगोडी दाखवून पळवून नेणे, आमिष दाखवणे, दिशाभूल करणे ह्या सगळ्या गोष्टी नमूद आहेत. महाराष्ट्रामध्ये किती भागात कुठल्या समाजात आणि काय कारण होत धर्मांतराची, त्याची माहिती द्यावी. माझी माहिती आहे गरिबी, गरिबीचा आधार घेऊन समाजात घुसून धर्मांतर केलं जातं. मग या सगळ्या गोष्टी देण्याची जबाबदारी सरकारची आहे, असे म्हणत अनिल परब यांनी धर्म स्वातंत्र्यावर विधानपरिषदेत चर्चा केली.

# सोलापूर जिल्ह्यात दहावीचा भूगोलचा पेपर फुटला; वेळापत्रकानुसारच पेपर होणार, बोर्डाने केले जाहीर

**पुणे (प्रतिनिधी)–** राज्यातील दहावी बोर्ड परीक्षेचा बुधवारी होणारा भूगोलाचा पेपर दिलेल्या वेळापत्रकानुसारच होणार आहे. सोलापूर जिल्ह्याच्या सांगोल्यात दहावीच्या परीक्षेदरम्यान भूगोलाचे ५० पेपर चोरी गेल्याची घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. या संपूर्ण घटनेचा अहवाल पुणे बोर्डाने मागितला होता. त्यामुळे, बुधवारच्या परीक्षेवर आणि बोर्डाच्या पेपरवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते, आज १० वी बोर्डाचा भूगोल विषयाचा पेपर होणार की नाही असा प्रश्न पालक आणि विद्यार्थ्यांना पडला होता. मात्र, बोर्डाने दहावीचा पेपर वेळापत्रकानुसार होणार असं जाहीर केलं आहे.

बुधवार दहावीचा भूगोलाचा पेपर शेड्युलनुसारच होणार आहे, विद्यार्थ्यांनी तयारी करून शांतपणे पेपर सोडवावा असे आवाहन पुणे एसएससी बोर्डाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी केले आहे. सांगोल्यातून उद्या होणाऱ्या भूगोलाच्या ५० पेपरची मंगळवारी सकाळी चोरी झाली होती. त्यामुळे बुधवारच्या पेपरबाबत पालक आणि विद्यार्थ्यांच्या मनात साशंकता होती. मात्र, उद्या ठरलेल्या वेळेप्रमाणेच भूगोलाचा पेपर होणार असल्याचे बोर्डाकडून सांगण्यात आलेले आहे.

दरम्यान, बोर्डाने पेपर घेण्याचा निर्णय घेतल्याने दहावीच्या भूगोलाच्या पळवून नेलेल्या ५० पेपरचे झेरॉक्स, फोटो कोणी काढले असेल आणि ते जर व्हायरल केले असेल तर त्याची जबाबदारी बोर्ड स्वीकारणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# राज्यातील महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची भरती

## तब्बल ५०१२ पदं भरणार, मंत्री चंद्रकांत पाटलांची घोषणा

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या मोठ्या भरतीला राज्य सरकारने मंजुरी दिली असून तब्बल ५०१२ पदे भरली जाणार असल्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत केली.

२०२६-२७ च्या अर्थसंकल्पातील अनुदान मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना चंद्रकांत पाटील यांनी ही माहिती दिली. राज्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता नव्या महाविद्यालयांना अनुदानित तत्त्वावर परवानगी देण्याच्या धोरणात बदल करणे सध्या शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, विद्यमान अनुदानित महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर भरती करून शैक्षणिक दर्जा उंचावण्यावर भर दिला जाणार आहे.

माहितीनुसार, राज्यातील सुमारे १२०० अनुदानित महाविद्यालयांमध्ये ५४०० प्राध्यापक पदांना मान्यता देण्यात आली आहे. तसेच विद्यापीठांमध्येही ७०० प्राध्यापकांची भरती होणार असून एकूण मिळून ६ हजारांहून अधिक पदांची भरती प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. चंद्रकांत पाटील यांनी सांगितले की, २००१ पासून राज्यात नव्या महाविद्यालयांना विना-अनुदानित तत्त्वावर परवानगी देण्याचे धोरण लागू आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांना विविध सवलती दिल्या जातात. अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना १००% शुल्क माफी, ओबीसी विद्यार्थ्यांना ५०% तर मुलींना पूर्ण शुल्क सवलत दिली जाते. या व्यवस्थेमुळे महाविद्यालयांचा आर्थिक भार काही प्रमाणात कमी होतो. दरम्यान, २००१ पूर्वी स्थापन झालेल्या ७८ महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबतचा अहवाल वित्त विभागाकडे पाठवण्यात आला असला तरी त्यावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

तसेच, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीसाठी करण्यात आलेल्या जाहिरातींच्या खर्चावरून सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यात आला. यावर उत्तर देताना चंद्रकांत पाटील म्हणाले की, २०२२ पासून महाराष्ट्रात एनईपीची अंमलबजावणी वेगाने सुरू असून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीसाठी जाहिराती आवश्यक होत्या. दरम्यान, उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत अनुदानित महाविद्यालयांतील सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील एकूण ११,९१८ रिक्त पदांपैकी ५०१२ पदे भरण्यास मंजुरी देण्यात आल्याने राज्यातील उमेदवारांसाठी ही मोठी संधी मानली जात आहे.

# गॅससाठी पहाटेपासून रांग, नांदेडकरांचा संयम कसोटीवर

## वजिराबाद येथील एचपी गॅस एजन्सीसमोर नागरिकांची लांबच लांब रांग



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील वजिराबाद परिसरात मंगळवारी सकाळपासूनच एचपी गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळलेली पाहायला मिळाली. श्री महावीर गॅस एजन्सी कार्यालयासमोर गॅस मिळविण्यासाठी नागरिकांनी मोठी रांग लावली होती.

शहरातील वजिराबाद परिसरात श्री महावीर गॅस एजन्सी आहे. या ठिकाणाहून सिलेंडर मिळविण्यासाठी नागरिकांनी हातात रिकामे सिलेंडर तर काहींनी दुचाकीवर तर काहींनी थेट सिलेंडरवर बसून आपला नंबर येण्याची वाट पाहत होते. वाढती मागणी आणि मर्यादित पुरवठा यामुळे नागरिकांना तासंतास उन्हात उभे राहावे लागत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून आले.

रांगेची लांबी इतकी वाढली की ती रस्त्याच्या कडेला दूरवर पसरली. यामुळे वाहतुकीलाही काही प्रमाणात अडथळा निर्माण झाला. विशेष म्हणजे, अनेक वृद्ध आणि महिलांनाही या रांगेत उभे राहावे लागत असल्याने प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

या सर्व परिस्थितीत नागरिकांनी संयम राखत आपला नंबर येण्याची वाट पाहिली, मात्र गॅस टंचाईचा प्रश्न गंभीर होत असल्याचे या दृश्यातून स्पष्ट होते.

# सिलेंडरचा अर्ज २४ तासांच्या आत मंजूर करण्याचे आदेश

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात युद्ध सुरू असल्याने भारतात मोठे उर्जासंकट आले आहे. घरगुती तसेच व्यावसायिक गॅस सिलिंडरची मोठी कमतरता भासत आहे. त्यामुळे सामान्यांकडून संताप व्यक्त केला जात आहे. असे असतानाच आता घरोघरी वेळेवर गॅस पोहोचावा यासाटी सरकारने मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एखाद्या व्यक्तीने पीएनजी कनेक्शनसाठी अर्ज केलेला असेल, त्या व्यक्तीचा अर्ज अवघ्या २४ तासांच्या आत मंजूर करण्याचा आदेश सरकारने दिला आहे.

# पाकिस्तानकडून अफगाणिस्तानच्या रुग्णालयावर एअरस्ट्राईक; ४०० जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अफगाणिस्तानमधील काबूलवर पाकिस्तानी हवाई दलाने एअरस्ट्राईक केला आहे. पाकिस्तानकडून रहिवाशी परिसर आणि रुग्णालयांना लक्ष्य करण्यात आले. पाकिस्तानी हवाई दलाने रुग्णालय आमि रहिवाशी भागांवर बॉम्बचा वर्षाव केला. यामध्ये आतापर्यंत जवळपास ४०० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

पाकिस्तानच्या या एअरस्ट्राईकवर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. याचदरम्यान, पाकिस्तानकडून पुन्हा नापाक हरकत सुरु आहे. काबूलमधील दहशतवादांच्या स्थळावर हल्ला केला असून रुग्णालयांवर हल्ला केला नसल्याचा दावा पाकिस्तानकडून करण्यात येत आहे. अफगाणिस्तान खोटं बोलत असल्याचा आरोपही पाकिस्तानने केला आहे.

रुग्णालय आणि रहिवाशी भागत हल्ला केल्याचा अफगाणिस्तानचा दावा पाकिस्तानने फेटाळून लावला. हा दावा खोटा असून, जनमताची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने करण्यात आला आहे, असे पाकिस्तानने म्हटले आहे. काबूलमधील कोणत्याही रुग्णालयाला लक्ष्य करण्यात आले नसल्याचे पाकिस्तानने स्पष्ट केले. पाकिस्तानच्या माहिती मंत्रालयाने एका सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, या हल्लयांमध्ये अफगाण तालिबानच्या लष्करी तळांना आणि दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्या पायाभूत सुविधांना अचूकपणे लक्ष्य करण्यात आले, ज्यात तांत्रिक उपकरणे आणि दारूगोळ्याच्या गोदामांचा समावेश होता.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली पंतप्रधानांची भेट

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** राज्यातील अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावर गेले असून, त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत दीड तास सखोल चर्चा केली. ही चर्चा सकाळी ११ ते १२,२० दरम्यान पार पडली. त्यानंतर १२:३० वाजता शिंदे यांनी संसदेचे सभापती ओम बिर्ला यांची देखील भेट घेतली आहे. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत खासदार श्रीकांत शिंदे देखील उपस्थित होते. यावेळी रिजिजू यांनी एकनाथ शिंदे यांना 'श्रीकांत मेरा छोटा भाई है', असे म्हटले. त्यांच्या संभाषणाची आता जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचा नांदेड दौरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड हे दि. १९ मार्च रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.



गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वा. जि. यवतमाळ मोवाडा येथून हेलिकॉप्टरने धनोडा हेलिपॅड ता. माहूर जि. नांदेडकडे प्रयाण. सकाळी १०.५५ वा. धनोडा हेलिपॅड येथे आगमन व शासकीय वाहनाने धनोडा उच्च पातळी बंधारा साईट, ता. माहूर जि. नांदेड कडे प्रयाण. सकाळी ११ वा. धनोडा उच्च पातळी बंधाऱ्यांच्या उदघाटन कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ- धनोडा उच्च पातळी बंधारा साईट, ता. माहूर जि. नांदेड. सकाळी ११.५५ वा. धनोडा उच्च पातळी बंधारा येथून शासकीय वाहनाने धनोडा हेलिपॅड कडे प्रयाण. दुपारी १२ वा. धनोडा हेलिपॅड येथे आगमन व हेलिकॉप्टरने शंकर लोदी हेलिपॅड ता. जिवती जि. चंद्रपूरकडे प्रयाण करतील.

# नांदेड परिक्षेत्रात गुटखा विरोधी मोहीम; १३ आरोपी गजाआड, १४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आयोजित केलेल्या गुटखाविरुद्ध मोहिमेअंतर्गत एकूण ९ गुन्हे दाखल करण्यात आले असून, गुटखा विक्री करणाऱ्या १३ आरोपीना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत १४ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्तक करण्यात आला आहे.

सदर मोहिमेअंतर्गत, परिक्षेत्रातील नांदेड, हिंगोली व परभणी जिल्ह्यात प्रत्येकी (२), तर लातूर जिल्ह्यात (३) अशा एकूण ९ कारवाया करण्यात आल्या आहेत. या कारवायांमध्ये एकूण १३ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेकडून एकूण १४ लाख ४३ हजार १४९ रुपये किंमतीचा गुटखा व इतर तंबाखूजन्य पदार्थासह दोन वाहने देखील जप्त करण्यात आली आहेत. उपरोक्त पदार्थाच्या संदर्भात, संबंधिताविरुद्ध कलम १२३ बीएनएस अन्वये करण्यात आलेल्या कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असून त्यास दहा वर्षेपर्यंत कारावासासह द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.



परिक्षेत्रात गुटखा व इतर प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थाविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने विशेष मोहीम राबविण्यात येत असून, सदर मोहिमेदरम्यान स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, अपमित्रके युक्त चघळण्याची तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी, गुटखा, पान मसाला, खर्रा, मावा व तत्सम पदार्थांची साठवण, वितरण व वाहतूक याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये कारवाई करण्याच्या सूचना परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली या चारही जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

# मुदखेड पोलीस आणि महसूल पथकाची मुगट घाटावर कारवाई

## १ कोटी ३१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त, सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल


**नांदेड (प्रतिनिधी)–** मुदखेड तालुक्यात मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्राप्त झाल्यानंतर मुदखेड तहसील आणि पोलीस निरीक्षक यांनी मुगट शिवारात असलेल्या गोदावरी नदी पात्रात मंगळवार, दि. १७ मार्च रोजी संयुक्त कारवाई केली. यावेळी अवैध वाळू उपसा करणारी जवळपास एक कोटी ३१ लाख ४० हजार रुपयांचे साहित्य जप्त केले असून काही जागेवरच स्फोट घडवून नष्ट करण्यात आले. यावेळी पोलिसांनी सात वाळू माफियांविरुद्ध मुदखेड ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश ऑऊट अंतर्गत सर्व पोलीस स्टेशन प्रभारी यांना अवैध रेतीची चोरटी वाहतूक व विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने दि. १७ मार्च



२०२६ रोजी पेट्रोलिंग दरम्यान गोपनीय माहिती मिळाली की, काही वाळू माफिया हे इंजिनच्या साह्याने मुगट परिसरातील गोदावरी नदीतून अवैध रेती उपसा करीत आहेत. सदर मिळालेल्या माहितीवरुन नमुद ठिकाणी पथकाने मुदखेड तहसीलचे कर्मचारी आणि पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक कांबळे यांच्या पथकाने छापा कारवाई केली असता तेथे दिगंबर पाटील कर्डिले, बालाजी सपुरे, ज्ञानेश्वर आनंद मस्के, गजानन कर्डिले सर्व राहणार नागापूर तालुका नांदेड, करण मोरे, छगन भुक्तरे, देवानंद दुधमल सर्व रा. ब्राह्मणवाडा हे इंजिनच्या सहाय्याने गोदावरी नदीपात्रातुन अवैध रेतीचा उपसा करीत असताना पोलीस पथकास पाहुन पळून गेले.

सदर घटनास्थळावर रेती उपसा करण्यासाठी लागणारे पाच लोखंडी हॉपर ज्यास इंजिन बोट यासह अवैध रेतीसाठा ३५ ब्रास ज्याची किंमती १ लाख ४० हजार रुपये असा एकूण १ कोटी ३१ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमालाचा महसुलचे अधिकारी यांनी पंचनामा करुन रेती जप्त केली. इतर मुद्देमाल अवजड असल्याने जागीच जिलेटीनचे सहाय्याने नष्ट करण्यात आला आहे. वरील आरोपींविरुध्द मुदखेड पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार महेंद्र कवठेकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.






जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# रोजगार वाढ का होत नाही?

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने नुकत्याच जाहीर केलेल्या अहवालानुसार असंघटित क्षेत्रातील उपक्रमांमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत १३% वाढ झाली आहे. रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने हा सकारात्मक बदल वाटत असला, तरी त्यामागील गुंतागुंतीचे चित्र मात्र चिंताजनक आहे. रोजगारनिर्मितीचा दर कमी असून, वाढणारे रोजगार प्रामुख्याने असंघटित स्वरूपाचे आहेत. या घडामोडींमुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्थितीवर गंभीर चर्चा होणे आवश्यक ठरते. असंघटित क्षेत्रातील वाढ झालेल्या 'ऑन अकाऊंट एंटरप्रायजेस' (ओएई) यामध्ये बहुतांश लहान व्यवसाय, कौटुंबिक उद्योग यांचा समावेश आहे. या व्यवसायांत बाहेरच्या व्यक्तींना रोजगार दिला जात नाही. त्यामुळे एकीकडे रोजगारनिर्मितीचा आकडा वाढताना दिसतो, पण त्याचा अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होत नाही. अशा प्रकारची वाढ भारताच्या सर्वसमावेशक आर्थिक विकासाचा दर्शक आहे का, याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. असंघटित क्षेत्रे कर प्रणाली व नियामक यंत्रणेतून वंचित राहतात, परिणामी त्यांचे योगदान जीडीपीमध्ये कमी राहते. ही आकडेवारी केवळ संख्यात्मक वाढ दाखवते; मात्र वास्तविक स्थितीमधील बदल स्पष्ट करत नाही. रोजगारनिर्मितीची असमानता शहरी व ग्रामीण भागातील रोजगार वाढीतील विसंगती हा आणखी एक गंभीर मुद्दा आहे. शहरी भागांतील रोजगार संधी कमी होत असताना कृषी क्षेत्रात वाढ झालेली दिसते. परंतु कृषी क्षेत्रात जास्त रोजगारनिर्मिती ही आरोग्यदायी अर्थव्यवस्थेचे लक्षण नसून, इतर क्षेत्रांतील रोजगार संधींच्या अभावाचे द्योतक आहे. याशिवाय असंघटित क्षेत्रात कमी मानधन व असुरक्षित कामाचे स्वरूप ही समस्याही भेडसावत आहे. संघटित स्वरूपातील रोजगार वाढीसाठी धोरणात्मक हस्तक्षेपाची नितांत गरज आहे. सरकारची भूमिका व उपाययोजना असंघटित क्षेत्रातील वाढत्या रोजगारांची समस्या सोडवण्यासाठी सरकारने पुढाकार घेणे आवश्यक आहे. रोजगारनिर्मिती करणाऱ्या मोठ्या उद्योगांवर भर देत, तंत्रज्ञान व शिक्षणाच्या माध्यमातून कामगारांचे कौशल्यवृद्धी करणे महत्त्वाचे आहे. तसेच बिगर नियामक क्षेत्रांमधील कंपन्यांना कर सवलती, अनुकूल आर्थिक धोरणे यांद्वारे प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. प्रशासकीय सोप्या प्रक्रिया आणि गुंतवणुकीस अनुकूल वातावरण निर्माण केल्याने अधिक रोजगारनिर्मिती शक्य होईल. नियोजन आणि तरुणांच्या संधी भारतासारख्या तरुण देशात बेरोजगारी हा मोठा प्रश्न आहे. तरुण वर्गाला सक्षम व दीर्घकालीन रोजगार मिळण्यासाठी शैक्षणिक व्यवस्था, प्रशिक्षण संस्था, स्टार्टअप संस्कृती यांना चालना देणे गरजेचे आहे. याशिवाय असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी संरक्षणात्मक धोरणे तयार करून त्यांना संघटित क्षेत्रात स्थान मिळवून देणेही अत्यावश्यक आहे. असंघटित क्षेत्रातील रोजगारवाढ ही अर्थव्यवस्थेच्या विकासाचे परिपूर्ण चित्र दर्शवत नाही. हा मुद्दा सखोल विचार व ठोस धोरणांच्या माध्यमातून सोडवण्याची गरज आहे. तरुणांची ऊर्जा आणि कौशल्य यांचा योग्य उपयोग केला, तर भारत रोजगारनिर्मितीच्या मार्गावर स्थिरपणे पुढे जाऊ शकेल. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी रोजगार निर्मिती ही केवळ आकड्यांपुरती मर्यादित न ठेवता, ती दीर्घकालीन, टिकाऊ व सर्वसमावेशक करण्याचा प्रयत्न करणे, हाच आजच्या परिस्थितीतील खरा उपाय आहे.

# प्रदूषित नद्यांची चिंता कुणाला?



भारतीय संस्कृतीत अनादी काळापासून नद्यांना विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते की, सकाळी पवित्र नद्यांचे स्मरण केल्यास जीवनात यश मिळते. नद्यांनी संस्कृतीच्या ९ारतीय संस्कृतीत नद्यांना देवी समतुल्य मानले जाते. गंगेसह अनेक नद्यांचा उगम देवतांशी जोडला गेला आहे. दैवी शक्तींच्या अस्तित्वाचा संबंध नद्यांच्या प्रवाहाशी जोडण्यामागे कदाचित नद्यांचे महत्त्व आपण स्वीकारले पाहिजे हा हेतू असावा. मानवी संस्कृतीचा विकासही नद्यांच्या काठीच झाला. काळाच्या ओघात पाण्याच्या सहज उपलब्धतेमुळे नद्यांच्या काठावरील वसाहतींची रचना दाट होत गेली. हळूहळू या वसाहतींनी मोठ्या शहरांचे रूप धारण केले. पृथ्वीवरील सर्व जलस्रोतांपैकी सत्त्याण्णव टक्के पेक्षा जास्त पाणी खारे आहे आणि बाकीचे बहुतेक हिमनगांच्या रूपात गोठलेले आहेत. या गोठलेल्या जलस्रोतांमधून बहुतांश प्रमुख नद्या उगम पावल्या आहेत. पृथ्वीवरील लोकसंख्येचा मोठा भाग पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी नद्यांवर अवलंबून आहे. यामुळेच प्राचीन काळी नद्यांच्या प्रवाहाची शुद्धता राखण्याकडे विशेष लक्ष दिले जात असे. असं म्हटलं जातं की, ज्योतिषशास्त्राच्या सामान्य समजुतीनुसार नद्यांच्या पाण्यात घाण टाकणाऱ्याला मातृ ऋणाचा शाप मिळतो. लोकांनी नद्यांच्या पाण्यात घाण टाकू नये, ही या श्रद्धेमागची मानसशास्त्रीय वस्तुस्थिती आहे. पण आपण पारंपारिक समज नाकारल्या आणि त्याचा परिणाम असा झाला की, ज्या नद्या एकेकाळी पवित्र मानल्या जात होत्या त्या नद्यांमध्ये डुबकी मारल्याने सगळे पाप धुतले जातात अशी अंधश्रद्धा पसरवली, आणि आज याच नद्या इतक्या प्रदूषित झाल्या की, यातले पाणी पिण्यायोग्यही राहिले नाही.

तार्किक असण्याच्या आग्रहात परंपरा समजून घेण्याचा प्रयत्न करण्याऐवजी आम्ही आंधळेपणाने त्यांचे अनुसरण करू लागलो. प्राचीन काळी नद्यांवरच्या पुलावरून जाणारे प्रवासी नद्यांबद्दलची श्रद्धा व्यक्त करण्यासाठी नदीच्या पाण्यात काही नाणी टाकत असत. हा तो काळ होता जेव्हा नाणी तांबे किंवा चांदीची होती. तांबे आणि चांदीमध्ये पाणी शुद्ध करण्याचे नैसर्गिक गुणधर्म आहेत. म्हणजेच प्रतिकात्मकदृष्ट्या मानव नदीच्या पाण्याची शुद्धता राखण्याच्या विधीमध्ये अंशतः हातभार लावत असे. पण नंतर याच पाण्यात शिसे किंवा इतर धातूंची नाणी टाकली जाऊ लागली. नद्या आपली पापे धुवून टाकतात ही श्रद्धाही त्यांच्या प्रदूषणाचे कारण बनली. कोरोनाच्या काळात हजारो अर्धे जळालेले किंवा न जळलेले मृतदेह नद्यांमध्ये फेकण्यात आले. यातून नदीचे पाणी किती प्रदूषित झाले असेल याची कल्पना करा.

गेल्या काही दशकांमध्ये नद्यांमधील प्रदूषण झपाट्याने वाढले आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने देशभरातील ६०३ नद्यांच्या प्रदूषणाच्या पाहणीचा अहवाल अलिकडेच प्रसिद्ध केला आहे. नदी प्रदूषणाच्या पाहणीत महाराष्ट्र पहिल्या तर मध्यप्रदेश दुसऱ्या क्रमांकावर आहे. या राज्यात १९ पट्टे आढळले आहेत. बिहार १८ पट्ट्यांसह तिसऱ्या स्थानी आहे. केरळमध्ये १८, कर्नाटकात १७, उत्तरप्रदेशात १७, राजस्थानात १४ तर गुजरातमध्ये १३ दूषित पट्टे आढळले आहेत. खरे तर ही गंभीर चिंतेची बाब आहे. कारण त्याचा थेट परिणाम मानवांवर होत आहे. जर नद्या प्रदूषित झाल्या आणि त्या टिकल्या नाहीत तर आपण पृथ्वीवर कसे जगू? आज ज्या प्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे आणि बहुतांश नद्या प्रदूषणाचा सामना करत आपले दिवस मोजत आहेत, हा एक मोठा इशारा आहे. काही काळापूर्वी सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंटने केलेल्या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की, भारतातील बहुतेक नद्यांच्या पाण्यामध्ये शिसे, कॅडमियम, आर्सेनिक, निकेल, क्रोमियम, लोह आणि तांबे यांचे प्रमाण धोकादायक पातळीपेक्षा जास्त आहे. सर्वेक्षणात एकशे सतरा नद्या आणि उपनद्यांमध्ये पसरलेल्या निरीक्षण केंद्रांच्या एक चतुर्थांश नमुन्यांमध्ये दोन किंवा अधिक विषारी धातूंचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले. या प्रदूषणासाठी खाणकाम, भंगार उद्योग आणि विविध धातुकर्म उद्योगांद्वारे पर्यावरणात सोडले जाणारे विषारी धातू कारणीभूत आहेतच, परंतु आपली आधुनिक जीवनशैलीही याला जबाबदार आहे.

गंगेसारखी नदी, तिच्या एकूण प्रवाहाच्या सुमारे अडीच हजार किलोमीटर क्षेत्रफळाच्या सुरुवातीलाच प्रदूषित होऊ लागते. उत्तराखंडच्या साडेचारशे किलोमीटरच्या प्रवाहात डझनहून अधिक नाल्यांतून पंचेचाळीस कोटी घन लिटरहून अधिक घाण पाणी गंगेत सोडले जाते. उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमध्येही हेच वर्तन या पवित्र नदीला सहन करावे लागत आहे. गंगा ही जगातील दहा सर्वाधिक प्रदूषित नद्यांपैकी एक असल्याचे आढळून आले आहे. आणखी एका अभ्यासात असे आढळून आले आहे की, गंगा नदी ही जगातील सर्वात जास्त कचरा समुद्रात वाहून नेणाऱ्या नद्यांपैकी एक आहे. कल्पना करा, जी नदी जीवनदायी आहे असे म्हटले जाते, त्या नदीच्या बाजूने समुद्रात जाणाऱ्या कचऱ्याचा पर्यावरणावर आणि जलचर प्राण्यांच्या आरोग्यावर काय परिणाम होत असेल? गंगासारख्या नदीची ही अवस्था असेल तर इतर नद्यांच्या दुर्दशेची काय अवस्था असेल. यमुनेत उठणारा पांढरा फेस तिच्या प्रदूषणाची कहाणी सांगतो. एकेकाळी झारखंडची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या दामोदर नदीचे पाणी इतके प्रदूषित झाले आहे की, खुद्द पर्यावरण विभागाच्या म्हणण्यानुसार अनेक ठिकाणी तिचे पाणी पिण्यायोग्य राहिलेले नाही. सुवर्णरेखा नदीला एकेकाळी झारखंडची गंगा म्हटले जायचे, पण आता ती आंघोळीसाठीही लायक राहिलेली नाही.

मध्य प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार अमरकंटकमध्ये नर्मदा सर्वाधिक प्रदूषित आहे. अमरकंटक, ओंकारेश्वर यांसारख्या तीर्थक्षेत्रांच्या नर्मदेच्या पाण्यात क्लोराईड आणि विद्राव्य कार्बनडायऑक्साइडची पातळी चिंताजनक बनली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने देशभरातील ६०३ नद्यांच्या प्रदूषणाच्या पाहणीचा अहवाल अलिकडेच प्रसिद्ध केला आहे. महाराष्ट्रातील नद्यांच्या अहवालात अतिप्रदूषित गटात चार पट्टे आढळून आले. त्यात कृष्णा नदीचाही समावेश आहे. भीमा, गिरणा, गोदावरी, गोमती, हिरवा, इंद्रायणी, काळू, कोयना या नद्याही अनेक पट्ट्यात प्रदूषित झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. सर्वाधिक ५५ पट्टे महाराष्ट्रातील आहेत. उत्तर प्रदेशातील पूर्वांचलला हिरवेगार ठेवणाऱ्या डझनहून अधिक नद्या मृतावस्थेत आहेत. गोमती, पीलीनदी, मागाई, गदई, तामसा, विशाही, चंद्रप्रभा, सोन नदी आदींची अवस्था बिकट आहे. किंबहुना, पवित्र नद्यांच्या काठावरील काही समारंभ आणि विधी पाण्याच्या प्रदूषणासाठी काही कमी जबाबदार नाहीत, कारण आपण पूजा साहित्य किंवा पूजेत वापरल्या जाणाऱ्या मूर्ती पाण्यात विसर्जित करता येतील या विचाराने नदीत टाकतो. पाण्यात वस्तू टाकून प्रवाहित केल्याने पाप लागणार नाही, असे मानतो. मात्र असे करत असताना आपण हे विसरतो की हे पदार्थ तयार करताना वापरलेली रसायने किंवा काही घटक पाण्याला गुदमरून टाकण्याचे काम करतात.

विषारी धातूंबरोबरच नद्यांच्या पाण्यात रासायनिक औषधांमुळेही प्रदूषणात अत्यंत वाईट प्रकारे वाढ होत आहे. जगातील सर्व खंडांतील एकशे चार देशांतील दोनशे अठ्ठावीस नद्यांवर केलेल्या संशोधनात ही बाब समोर आली आहे. या संशोधनात जगातील शंभरहून अधिक शास्त्रज्ञांचा सहभाग होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, नद्यांच्या पाण्यात अपस्मारविरोधी औषध कार्बामाझेपिन, मधुमेहावरील औषध मेटफॉर्मिन आणि कॅफिनसह विविध औषधांचे घटक धोकादायक प्रमाणात आढळून आले. हे घटक मानवी कचरा, प्रक्रिया न केलेला मलनिस्सारण, नदीकाठचा कचरा किंवा औषध कंपन्यांकडून प्रक्रिया न केलेला कचरा नद्यांमध्ये प्रवेश करतात. एकोणीस टक्के ठिकाणी, संशोधकांना धोकादायक पातळीवर नदीच्या पाण्यात जैव-प्रतिरोधक आढळून आले आहे. ही पर्यावरणासाठी एक नवीन जागतिक समस्या म्हणूनही उदयास येत आहे. भारतातील नद्यांच्या नमुन्यांमध्ये कॅफिन, निकोटीन, वेदनाशामक, अँटीबायोटिक्स, अँटी डिप्रेसंट्स, अँटी-डायबेटिक, अँटी-ॲलर्जिक औषधे आढळून आली आहेत. नद्यांमधील औषधांमुळे वाढणारे प्रदूषणही संवेदनशील लोकांना घाबरवू लागले आहे, कारण या प्रदूषणाचा अप्रत्यक्षपणे करोडो लोकांच्या जीवनावर परिणाम होऊ शकतो.

**–मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# विनोद विविध रंगाचा व नात्यागोत्याचा



एका युरोपीयन व्यक्तीला आपल्या गोऱ्या रंगाचा भलताच अभिमान होता.तो एका भारतीय व्यक्तीला चिडवत होता.'तुमच्याकडे कोणी गोरा,तरं कोणी निमगोरा,कोणी गव्हाळ तर कोणी सावळा, कोणी काळा तरं कोणी एवढा काळा कुळकुळीतं की त्याच्यापैक्षा खाणीतला कोळसा बरा.आमच्याकडे कसे सगळेचं गोरेपानं अगदी एकाच रंगाचे असतात. एवढे बोलून झाल्यावर तो जोरजोरातं हसायला लागला.सोबत भारतीय माणूस त्यापेक्षाही जोरातं हसायला लागला. तेंव्हा त्या युरोपीयन व्यक्तीचे स्वगत सुरु झाले. याला डिवचण्यासाठी आपण त्यांच्या समिश्र रंगाविषयी हेतूपुरस्सर बोललो तर हा माझ्यावर रागावण्याऐवजी मूर्खासारखे दातं काढतो. याला काही स्वाभिमान, प्रतिष्ठा, आत्मभान आहे की नाही. हा महामूर्ख आहे. आपला अपमान व सन्मान यातला फरक याला कळत नाही. या स्वगतानंतर तो युरोपीयन व्यक्ती चिडून ओरडला. कशाला हसतोस युसलेस त्या त्याच्या अती अंहकारी वृत्तीला अत्यंत आदबिने, सन्मानपूर्वक भारतीय व्यक्ती त्याला उत्तर देतो.

साहेब, तुमच्या कलईछाप पांढऱ्याफटक रंगाचा तुम्हाला खूप अभिमानं आहे, नाही का? पण एक गोष्ट नेहमीसाठी लक्षात ठेवा. गाढवं सर्व एकाच रंगाचे असतातं, घोडे मात्र विविध रंगाचे असतात. रंगातील वेगळेपणा आमच्यातीलं विविधता स्पष्ट करतो. तुम्हाला सावळा रंग प्राप्त करण्यासाठी सूर्य स्नान करावं लागतं. आम्हाला मात्र आमच्या निसर्गानं तो अगदी सहजपणे दिला आहे. तुम्ही आमच्या देशात डिसेंबर-जानेवारी महिण्यात येता, पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी व उष्णतेचा त्रास टाळण्यासाठी. तरीही रस्त्यावर कपड्याचे बटन उघडे ठेवून चालता. लाल जरद दिसता माकडासारखे आणि तोंडानं सारखं चालू असतं तुमचं.ओ माय गॉड, व्हेरी हॉट...व्हेरी व्हॉट...आता मला सांगा. तुमचा हा गोरा उर्फ कलई छाप रंग काय कामाचा हो.सूर्यप्रकाशाच्या अभावाने आलेली ही विकृती आहे.अर्थात हा संवाद ब्रिटिश गोऱ्या माकडाला समजण्यासाठी इंग्रजी भाषेतून सुरु होता.त्याच्या रंगाचं जळजळीत वास्तव त्याला कुणीही आतापर्यंत न सांगीतल्यामुळं तो लालबुंद होऊन काळा पडला होता,नंतर भारतीयं माणूस त्याला म्हणाला, जरा आरशात पहा. त्याने स्वत:कडे पाहिले व तो दातओठ खाऊनं प्रचंड क्रोधित झाला.त्याला समज देतं भारतीय माणूस म्हणाला, या प्रवृतीवर आमच्या हिंदी चित्रपटात एक गाणे आहे. गोरे रंगपे ना इतना गुमानं करं.... गोरा रंग तो दो दिनमे ढल जायेगा. तुझा गोरा रंग घालविण्यासाठी तरं मला पाचं मिनिटं सुद्धा लागले नाही.

मित्रहो यासाठी आपल्याला ज्या गोष्टी अनुवंशिकतेमुळे आपोआप प्राप्त झाल्यात त्यावर गर्व करण्यापेक्षा आपले कर्मच आपल्याला खूप मोठे करतं असते.एक माणूस म्हणाला, मी तिस वर्षापूर्वी जेवढे काम करत होतो तेवढेच आजही करतो.माझा उत्साह अजिबात कमी झाला नाही.ऐकणारा एकदम खूष झाला आणि म्हणला,अरे मला सांग काय आहे तुझा एनर्जीमंत्र. त्यासाठी नेमकं काय करावं लागेलं, कुठे जावं लागेलं, कोणत्या डॉक्टरला भेटावं लागेलं, काही जडीबुटी खावी लागेल का?मांत्रिकाला भेटावं लागेलं का?काही विशिष्ट पथ्य,अपथ्य वगैरे. अरे सांग ना लवकर!सांगणारा म्हणतो,एवढी कशाला घाई करतो,अगदी शांतपणे डोक्यावर बर्फगोळा ठेवून ऐक.मी तेंव्हाही काही करत नव्हतो आणि आजही काहीच करत नाही.या प्रामाणिक माणसानं किमान शेवटी का होईना सत्य सांगितले पण आपल्या आजु बाजूला अशी अनेक माणसं आहेतं.जी काहीचं करतं नाहीतं तरी आपणच सर्व काही करतो असा भासं निर्माण करतातं.कोणतेच कर्म न करता श्रेयवादा साठी चालणारी लढाई एवढी प्रचंड असते की सृष्टी चक्रही आमच्यामुळेच चालते असं सांगयलाही ही माणसं कमी करणारं नाहीत.

बरेचदा आपण सुधारलो.आपल्या वर्तनात प्रचंड परिवर्तन आले असा दावा करणारे माणसं आपल्या क्षुद्र मनोवृतीला एवढे काही घट्ट कवटाळून ठेवतातं, त्यामुळे त्यांच्यातील बदलं क्षणिक असतो. एका चोराची शिक्षा पूर्ण झाल्यावर त्याच्या मित्राने त्याला विचारले,एवढी शिक्षा भोगल्यावर नक्कीच तुझ्यात काही चांगले बदल झाले असतीलं आता कारावासातून बाहेर पडल्यावर तू कोणतं चांगलं काम करणार आहेस?तो तात्काळ म्हणाला एक टॉर्च विकत घेणार.मागच्या वेळेस अंधारात चुकून माझ्या कडून टिव्हीचे बटन दाबल्या गेले.त्यामुळे पकडल्या गलो.आता इंप्रुमेंट केली पाहिजे.प्रवृतीत मात्र काहीच बदल नाही.आज पक्षांतर करणाऱ्या नेत्यांची प्रवृती यापेक्षा वेगळी कायआहे?क्लुप्ती वेगळी पण प्रवृतीत मात्र कोणताच बदल नाही. त्यामुळंच परिवर्तन केवळ सत्तांतरआणि लोकप्रतिनिधींच्या स्वार्थाशी संबधित आहे.प्रश्नअसा आहे की जनतेच्या जीवनात कोणता बदल झाला ? हा प्रश्न सदैव जीवंत ठेऊन सत्ताधिशांना आपली पोळी शेकून घेणे नेहमी साठी महत्वाचे वाटत गेले.

खरेचं या अमूल्य भेटीची किंमत कशी करावी? मित्राच्या या उत्तराने लालची माणसाचा चेहरा खर्रकन उतरला. समोरच्याला 'मामा' बनविने शक्य झाले नाही.याचा पश्च्यात्ताप त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर स्षष्टपणे दिसतं होता.यापेक्षा आपल्या हावरट प्रवृतीला दोष दिला असता तर पशू प्रवृती कडून मनुष्य प्रवृतीकडे त्याची वाटचाल सुरु झाली असती.

तरी हा बिचारा सामान्य माणूस होता आणि जर परिस्थिती बेताचीचं असेल तर प्रवृतीविषयीचा विचार आपण करु शकतो,एका मंत्री महाशयाच्या मुलीच्या विवाह समारंभाच्या खर्चाची विभागणी ऐकूण मी अगदी थक्क झालो होतो.त्याने आपल्या संपर्कातील प्रत्येक कार्यकर्ते आणि ज्यांना ज्यांना आपल्यामुळे थोडाफार राजकीय लाभ झाला आहे. त्या सर्वांशी जोडलेला नातेसंबध अफलातून होता. अहो नवरीचे मामा भोजनखर्च तुमच्याकडं, नवरीचे काका दागिण्याचा खर्च तुम्ही पाहून घ्या. नवरीचे भाऊ वाजंत्री तुमच्याकडं, असा सर्व खर्च विभागून दिला होता.विशेष म्हणजे यातला एकही मी फक्त आशीर्वाद व शुभेच्छाच देणार आहे. हे सांगण्याचं धाडस करू शकत नव्हता.खरंच राजकारणाच्या बळावर एवढी नाती निर्माण करता येतातंआणि प्रत्येकाला भ्रष्टाचाराचे कुरण वाटून आपल्या प्रत्येक स्वच्छ कार्यात सहभागी करुन आपला परिवार किती महान बनवीता येतो.किती नातीगोती वाढविता येतातं.धन्य ते भारतीय राजकारणं!नातीगोती व सगेसोयरे. आमच्या रंगातीलं विविधतेचा खरा अर्थ इथे कळतो.

**–प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो.९०११२२९२३२

# भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा!



चाकण शहरात पुणे नाशिक महामार्गावरील आंबेठाण चौकाजवळ शोभा वाघमारे या महिलेवर भटक्या कुत्र्यांनी जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात त्या महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेचा व्हीडीओही व्हायरल होत आहे. या महिलेवर भटक्या कुत्र्यांनी इतका जबरदस्त हल्ला केला की महिलेला बचावाची संधी देखील मिळाली नाही. भटक्या कुत्र्यांनी या महिलेचे अक्षरशः लचके तोडले. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ माजली असून भटक्या कुत्र्यांची समस्या पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. अर्थात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जीव गमावलेल्या या पहिल्या व्यक्ती नाहीत. तीन वर्षापूर्वी बाघ बकरी चहा कंपनीचे संचालक पराग देसाई यांचाही भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला होता. पराग देसाई यांच्या मृत्यूनंतर भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनातर्फे ठोस पावले उचलण्यात येतील अशी अपेक्षा होती मात्र ही अपेक्षा फोल ठरली. कारण भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनातफ कोणतेही ठोस पावले उचलण्यात आले नाहीत. उलट भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढतच चालला आहे.

भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू झालेले पराग देसाई आणि शोभा वाघमारे हे दोघेच नसून याआधीही अशा अनेक घटना आपल्या देशात घडल्या आहेत आणि त्यात काहींचा जीवही गेला आहे. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दररोज सहा हजारांहून अधिक लोक जखमी होतात अशी सरकारी आकडेवारीच आहे.

दररोज सहा हजारांहून अधिक लोक जर भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी होत असेल तर ती मोठी गंभीर बाब आहे. केवळ शहरातच नाही देशातील गावागावात भटक्या कुत्र्यांची मोठी दहशत आहे. गाव असो वा शहर, चाळ असो वा सोसायटी, पायवाट असो वा महामार्ग, चौक असो वा नाका सर्वत्र तुम्हाला भटक्या कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी उभ्या असलेल्या दिसतील. हे भटके कुत्रे रस्त्यांवरून जाणाऱ्या लोकांवर अचानक हल्ला करतात. विशेषतः शाळकरी मुले, वृध्द, अपंग व महिलांना भटके कुत्रे टार्गेट करतात. दबा धरून बसलेले भटके कुत्रे अचानक घेराव घालून हल्ला करतात. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात लोक अक्षरशः रक्तबंबाळ होतात. भटक्या कुत्र्यांच्या चावण्याने रेबीज नावाचा रोग होतो. या रोगावर जर वेळीच उपचार केला नाही तर रोगी दगावण्याची देखील शक्यता असते मात्र अनेक सरकारी रुग्णालयात रेबीजवरील लसच उपलब्ध नसते.

ग्रामीण भागात तर हे नेहमीचेच चित्र आहे. भटक्या कुत्र्यांची दहशत केवळ रस्त्यांवरून जाणाऱ्या लोकानांच आहे असे नाही तर पाळीव प्राण्यांना देखील आहे. शेळी, मेंढी, कोंबड्या यासारख्या पाळीव प्राण्यांवर देखील भटकी कुत्री हल्ले करतात. भटक्या कुत्र्यांच्या झुंडी अचानक येऊन पाळीव प्राण्यांचा फडशा पाडतात. भटक्या कुत्र्यांचा त्रास वाहन चालकांना देखील होतो विशेषतः दुचाकी स्वारांना भटक्या कुत्र्यांची मोठी दहशत आहे. रस्त्यांवर दुचाकी दिसली की भटके कुत्रे वाहनांच्या मागे धावतात, वाहनांना आडवे येतात त्यामुळे बऱ्याचदा अपघात होतो आणि त्या अपघातात वाहन चालक जखमी होतात त्यामुळे भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून होत असते मात्र त्यावर प्रशासन गंभीर नसते.

२०१४ साली मुंबईत ९५ हजार भटकी कुत्री होती आज त्यांची संख्या १ लाख ६४ हजार इतकी आहे याचाच अर्थ मागील बारा वर्षात मुंबईतील भटक्या कुत्र्यांची संख्या ७२ टक्क्यांनी वाढली. जर भटक्या कुत्र्यांची संख्या अशीच वाढत राहिली आणि त्यांचे नागरिकांवर होणारे हल्ले देखील वाढत राहिले तर भविष्यात मानव विरुद्ध भटकी कुत्री असा संघर्ष निर्माण होऊ शकतो तो होऊ द्यायचा नसेल तर शासन, प्रशासनाने भटक्या कुत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी ठोस उपाय योजायला हवेत. केवळ निर्बिजीकरण केल्याने भटक्या कुत्र्यांची संख्या कमी होणार नाही हे सिद्ध झाले आहे.

प्राणीमित्र संघटनांनीही या प्रश्नाकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहायला हवे. भटक्या कुत्र्यांना सहानुभूती दाखवताना त्यांच्या हल्ल्यात जखमी होणाऱ्या नागरिकांकडे देखील सहानुभूतीने पाहायला हवे. आपल्या देशात २००१ साली प्राणी कल्याण कायदा लागू झाला या कायद्यानुसार भटक्या कुत्र्यांना संरक्षण मिळाले. भटक्या कुत्र्यांना ते आहेत त्या ठिकणापासून कोणीही हलवू शकत नाही शिवाय त्यांना त्याच ठिकाणी खायला घालणे अनिवार्य करण्यात आले. या कायद्यामुळे भटक्या कुत्र्यांना तर संरक्षण मिळाले पण नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून होणारा उपद्रव वाढला. भविष्यात हा उपद्रव आणखी वाढणार आहे . म्हणूनच या कायद्याचा मान राखून नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून होणारा उपद्रव कसा रोखता येईल यासाठी कोणता मध्यममार्ग काढता येईल यासाठी सरकारने एक समिती नेमावी. प्राणीमित्र संघटनेच्या सदस्यांसह, तज्ज्ञांचा समावेश या समितीत करावा. या समितीने योग्य मार्ग काढून भटक्या कुत्र्यांना संरक्षण देऊन त्यांच्यापासून नागरिकांना होणारा उपद्रव थांबवावा.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# 'स्वारातीम' विद्यापीठाची २६ वर्षांनंतर सुवर्णझेप; राष्ट्रीय युवक महोत्सवात ऐतिहासिक यश



**नांदेड (प्रतिनिधी)** –चेन्नई येथे पार पडलेल्या राष्ट्रीय युवक महोत्सवात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने तब्बल २६ वर्षांनंतर ऐतिहासिक यश संपादन केले आहे. देशातील आठ झोनमधील १४२ नामांकित विद्यापीठांमध्ये झालेल्या चुरशीच्या स्पर्धेत विद्यापीठाने लोक/आदिवासी नृत्य प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवले.

या स्पर्धेत विद्यापीठाने सहभाग घेतलेल्या सर्व सात कलाप्रकारांत पारितोषिके मिळवत १०० टक्के यशाची नोंद केली. यात लोक/आदिवासी नृत्य (दंडार नृत्य) आणि रॅली/मिरवणूक या प्रकारांत प्रथम क्रमांक, माईम (मूक अभिनय), लोक वाद्यवृंद, शास्त्रीय वाद्य एकल आणि लघुनाटिका (स्किट) या प्रकारांत द्वितीय क्रमांक, तर संकल्पना नृत्य प्रकारात पाचवा क्रमांक मिळाला.

या उल्लेखनीय यशामुळे विद्यापीठाचा संघ आता आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवात भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पात्र ठरला आहे. विशेष म्हणजे, २६ वर्षांपूर्वी लोकनृत्यात मिळवलेल्या सुवर्णयशाची परंपरा नव्या पिढीने पुन्हा जिवंत केली आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली संघाने अल्पावधीत मोठे आव्हान पेलत हे यश मिळवले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंह साबळे, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, आय.आय.एल.चे संचालक डॉ. शैलेश वाढेर, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, एन. एन. एस.चे संचालक डॉ. मारोती गायकवाड, आय.क्यू.ए.सी.चे संचालक डॉ. सुरेन्द्रनाथ रेड्डी, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम आदी मान्यवरांनी संघाचे कौतुक केले.

संघाचे व्यवस्थापन डॉ. संदीप काळे व सिद्धार्थ नागठाणकर यांनी सांभाळले. लोकनृत्यासाठी संदेश हटकर, तर रॅली व लघुनाटिकेसाठी दिग्दर्शक दिलीप डोम्बे यांनी प्रशिक्षण दिले. डॉ. शिवराज शिंदे यांनी लोकसंगीतासाठी मार्गदर्शन केले. तसेच संकेत गाडेकर आणि संभा कांबळे यांनीही यशासाठी विशेष योगदान दिले.

# भोकर येथे 'करिअर कट्टा' विभागीय पुरस्कार वितरण आणि कार्यशाळा उत्साहात संपन्न

## डॉ. वृषाली किन्हाळकर यांना 'आधुनिक सावित्री' पुरस्काराने सन्मानित

**भोकर (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत डॉ. वृषाली किन्हाळकर यांना 'आधुनिक सावित्री' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. भोकर येथील दिगंबरराव बिंदू महाविद्यालयात नांदेड विभागाचा हा विभागीय पुरस्कार वितरण सोहळा नुकताच पार पडला.



या कार्यक्रमात नांदेड विभागातील चार जिल्ह्यांमधील विविध महाविद्यालयांना एकूण २८ पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी विकसित भारत २०४७ महाराष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व उच्च शिक्षणाची भूमिका या विषयावर १६ मार्च २०२६ रोजी विशेष कार्यशाळेचेही आयोजन करण्यात आले होते.

पुरस्काराला उत्तर देताना डॉ. वृषाली किन्हाळकर म्हणाल्या की, करिअर कट्टा हा उपक्रम तरुणांच्या हाताला काम देणारा आणि त्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारा आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या मातीशी नाते जोडून प्रगती करावी, यासाठी हा उपक्रम दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करतो. अशा पुरस्कारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती निर्माण होऊन त्यांना अधिक उंची गाठण्याची प्रेरणा मिळते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उपविभागीय पोलीस अधिकारी डी. एस. हाके यांनी विद्यार्थ्यांना यशाचा मंत्र दिला. ते म्हणाले, जीवनात 'प्लॅन' किंवा 'इ' अपयशी ठरले तरी खचून न जाता सातत्य, चिकाटी आणि मेहनत या त्रिसूत्रीचा अवलंब करावा. आत्मविश्वासाच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते.

यशवंत शितोळे (महाराष्ट्र प्रमुख, करिअर कट्टा): यांनी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

डॉ. सूर्यकांत जोगदंड (सदस्य, व्यवस्थापन परिषद, स्वारातीम विद्यापीठ): यांनी जागतिकीकरणाच्या युगात भारतीय विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा गौरव केला. 'विकसित भारत २०४७' मध्ये उच्च शिक्षणाची भूमिका कळीची ठरेल, असे त्यांनी नमूद केले.

प्रा. डॉ. सतीश चव्हाण यांनी प्रास्ताविकातून करिअर कट्टा, स्पर्धा परीक्षा तयारी आणि उद्योजकता विकासाबाबत सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचा समारोप प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण यांनी आभार मानून केला. या सोहळ्याला नांदेड विभागातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्राच्या जडणघडणीत महिलांचे मोठे योगदान –प्रा. डॉ. आर. डी. देशमुख



**नांदेड (प्रतिनिधी)**– राष्ट्राच्या जडणघडणीत महिलांचे प्राचीन काळापासून मोठे योगदान राहिले आहे. महिला सर्वप्रथम अन्नपूर्णा आहे, ती एक शक्ती आणि प्रेरणा आहे. आज महिला उच्च शिक्षण घेऊन सर्व क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहे. ही देशाची शान आहे. महिलांनी आपल्या नाती जपत संधीचे सोनं करावेत. विशेष म्हणजे महिलांचे कार्य अत्यंत विश्वासनीय असते, असे प्रतिपादन प्रा. डॉ. आर. डी. देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले आहे.

गोदावरी अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक लि. नांदेडच्या वतीने नुकताच जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे चेअरमन प्रा. डॉ. आर. डी. देशमुख हे होते. याप्रसंगी बँकेचे संचालक प्रा. डॉ. मनीषा देशमुख, संधू अमरजीतकौर, कांचन परिहार, मेघा पतंगे, अमृता सोलंकर आदींचा शाल व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला.

महिला दिनाच्या निमित्ताने संचालक प्रा. डॉ. सुधीर टाले, प्रा. प्रभाकर जाधव, डॉ. सायन्ना मठमवार यांनी आपले विचार मांडले. तसेच सत्कारमूर्ती कांचन परिहार, प्रा. डॉ. मनीषा देशमुख, संधू अमरजीतकौर आणि अमृता सोलंकर यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक तथा सुरेख संचालन प्रा. डॉ. जी. टी. वाघमारे यांनी केले तर आभार व्यवस्थापक राम कल्याणकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाखेचे व्यवस्थापक पुंडलिक पावडे आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास बँकेच्या दोन्ही शाखेचे सर्व कर्मचारी, महिला–पुरुष उपस्थित होते.

# महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेची बैठक संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेची जिल्हा शाखेची द्विमासिक बैठक राज्य कोषाध्यक्ष जी. एस. मंगनाळे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच समृद्धी अभ्यासिकेच्या बाजूला मोरचौक नांदेड येथे संपन्न झाली. विभागीय संघटक युसूफ शेख यांच्या उपस्थितीत बैठकीतील मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

सन २०२५–२६ वार्षिक सभासद नोंदणी, उर्वरित तालुका शाखा पुनर्बांधणी नियोजन करण्यात आले. शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करुन जिल्हा, राज्य पातळीवर निवेदन देण्याचे नियोजन करुन महिला जिल्हा शाखा पुनर्बांधणी नियोजन करण्यात आले.

बैठकीला जिल्हाध्यक्ष जी. बी. मोरे, जिल्हा सरचिटणीस एम. डी. पेठकर, जिल्हा विभागीय उपाध्यक्ष समर्थ एकाळे, जिल्हा कार्याध्यक्ष एस. यु. पतंगे, जिल्हा कार्यालयीन सचिव शिवाजी पिंगळे, गंगाधर वडजे, बी. एल. पोशेट्टी किनवट, शिवाजी सूर्यवंशी मुदखेड, बसवेश्वर भुरे लोहा, सतीश भंडारे हदगाव, महाविष्णू नाईकवाडे हिमायतनगर, पी. व्ही. फुके अर्धापूर, एम. एम. पाटोदेकर, नागभिडे, बी. एन. कांबळे, आर. एस. गोणे, अशोक पवार आदी उपस्थित होते.

# क्लिंजिंग थेरपीचा (सफाई उपचार) अवलंब करून औषधमुक्त व रोगमुक्त जीवन जगा

## महिला दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– यशवंत महाविद्यालयात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वैद्यकीय सहायता कक्ष आणि महिला सुरक्षा व सुधार समितीच्या वतीने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्र–कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे होते. उपप्राचार्या डॉ. कविता सोनकांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख वक्ते डॉ. पियुष सक्सेना होते.



वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे समन्वयक डॉ. एस. एम. मोरे व डॉ. मंगल कदम, महिला सुरक्षा व सुधार समिती समन्वयक तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

आजच्या धावपळीच्या आणि ताणतणावाच्या जीवनशैलीमुळे अनेक प्रकारच्या आरोग्य समस्या निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत शरीर निरोगी ठेवण्यासाठी नैसर्गिक, सोप्या आणि प्रभावी पद्धतींचा अवलंब करणे अत्यंत गरजेचे ठरत आहे. याच अनुषंगाने प्रमुख वक्ते डॉ. पियुष सक्सेना यांनी, टीम क्लिंजिंग थेरपी (सफाई उपचार) अवलंबा आणि औषधमुक्त व रोगमुक्त जीवन जगा या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर मार्गदर्शन केले.

# गुरुद्वारा सिख छावनी अत्तापूर, हैद्राबाद येथील जमिनीचा वाद सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न –पंजप्यारे साहिबान

**नांदेड (प्रतिनिधी)** – गुरुद्वारा सिख छावनी अत्तापूर, हैद्राबाद (तेलंगाना) येथील जमीन सरकारने जप्त केली. परंतु ही जमीन अत्तापूर स्थित गुरुद्वारा साहिबची होती ज्याची एकूण चतुर्सिमा १.५ एकर आहे. या जमिनीचा वाद न्यायालयात सुरु होता आणि या जमिनीचा निकाल गुरुद्वारा साहिबच्या पक्षात आला. परंतु या निकाला नंतर काही स्थानिक लोकांनी ही जमीन मंदिराची आहे अशी तक्रार प्रशासनाकडे केली. यामुळे प्रशासनाने कारवाई करत या १.५ एकर जमिनीपैकी १००० गज जमीन गुरुद्वारा साहिबला देऊन



बाकीची जमीन जप्त करण्याची कारवाई केली. यामुळे काही काळ या परिसरामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले. या स्थितीमध्ये तेथील पोलीस प्रशासनाने काही शिख व्यक्तींवर गुन्ह्यांची नोंद सुध्दा केली.

ही सर्व परिस्थिती लक्षात घेता सोमवार, दि. १६ मार्च रोजी तख्त सचखंड श्री हजूर साहिबचे पंज प्यारे साहिबान यांनी एक बैठक घेतली आणि गुरुद्वारा बोर्डाच्या वतीने तेलंगणाचे मुख्यमंत्री आणि संबंधित अधिकाऱ्यांना हे प्रकरण लवकरात लवकर सोडविण्यासाठी विनंती करणारे एक शिष्टमंडळ पाठविण्याचा निर्णय एकमताने घेतला. या बैठकीत गुरुद्वारा बोर्डचे प्रशासक डॉ. विजय सतबीरसिंघ यांनी फोन करुन या संदर्भात सर्व माहिती घेऊन नंतर या संदर्भात योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले.

या वेळी जत्थेदार संत बाबा कुलवंतसिंघ, हेडग्रंथी सिंघ साहिबभाई कश्मीरसिंघ, धुपिया सिंघ साहिब भाई राम सिंघ, भाई गुरदीपसिंघ, भाई रणजीत सिंघ, डिप्टी अधीक्षक रविंदर सिंघ कपूर, सहा. अधीक्षक बलविंदरसिंघ फौजी, दर्शन सिंघ इंचार्ज कमेटी विभाग, तथा गुरुद्वारा बोर्डचे विधी सल्लागार जसपाल सिंघ सुखमनी हजर होते.

# प्रयत्नवादी व वास्तव विचारधारा हेच आमच्या यशाचे गुपीत –डॉ. समृध्दी पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)**– सदैव सकारात्मक विचार करुन मुलगा–मुलगी हा भेद न पाळता घरातील मातृशक्तीचा सर्वोच्च सन्मान करणारी मराठा सेवा संघाची वास्तव व प्रयत्नवादी विचारधारा अंगिकारने हेच आमच्या यशाचे गुपीत असल्याचे प्रतिपादन यवतमाळच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या एमबीबीएस अंतिम वर्षाची विद्यार्थिनी डॉ. समृध्दी पाटील यांनी केले आहे.

मराठा सेवा संघ प्रणीत तानुबाई बिरजे पत्रकार परिषदेच्या वतीने आयोजित शिवकुटुंब मेळावा या तीन दिवसीय धमाल, निवासी व नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या मराठा सेवा संघाने आम्हाला काय दिले या अंतिम सत्रात डॉ. समृध्दी पाटील बोलत होत्या.



पुरुषोत्तम खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योजक विलास पाटील, बांधकाम व्यावसायिक लक्ष्मण पाटील, संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते प्रेमकुमार बोके व जिजाऊ ब्रिगेडच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सीमा बोके यांच्या सहयोगाने पंचतारांकित हॉटेल वागाटोर डाऊनटाऊन येथे संपन्न झालेल्या सोहळ्यात माजी आमदार रेखाताई खेडेकर, राष्ट्रीय किसान नेता अविनाश काकडे, मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवाजीराजे पाटील, आदर्श माता पुरस्कारप्राप्त समाजसेविका रंजना पाटील बाभळीकर, जिजाऊ ब्रिगेडच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. निर्मला पाटील, राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुनील महाजन, उद्योजक आर. एस. पाटील, डॉ. संजय पाटील, इंजि. लिंबराजबप्पा सूर्यवंशी, संतोष ठाकरे, गणेश कापसे, प्रमोद महाजन, सोपान क्षीरसागर, प्रा. कपिल पिचेवार आदी मान्यवर उपस्थित होते.

लक्ष्यवेधी ठरलेल्या व अस्खलित हिंदी व इंग्रजी भाषेत केलेल्या भाषणात समृध्दी पाटील म्हणाल्या की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस करणे ही माझ्या करिअरच्या वाटेवरील एक छोटीशी पायरी असून यापुढे माझ्या जीवनाचे ध्येय साध्य करण्यासाठी सुध्दा मला संत तुकाराम महाराज, संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, जिजाऊ, शिवराय, शंभूराजे, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांची व मराठा सेवा संघाच्या केडर कॅम्पमधील सकारात्मक, अंधश्रध्दामुक्त, वैज्ञानिक, वास्तविक, प्रयत्नवादी व कौशल्य विकसित करणाऱ्या प्रेरणेची गरज आहे. मराठा सेवा संघ ही माझ्यासाठी केवळ एक सामाजिक संघटना नसून आमची एक्स्टेन्डेड फॅमिली आहे. अत्यंत प्रभावी व सुबक मांडणीने नांदेड जिल्ह्याची भूमिकन्या डॉ. समृध्दी पाटील यांनी उपस्थितांची मने जिंकली.

# मंत्री संजय शिरसाठ यांच्या अॅट्रॉसिटी कायद्यात बदल करण्याच्या विधानाचा बहुजन संघर्ष सेनेतर्फे निषेध



**नांदेड (प्रतिनिधी)**– सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी विधानसभेत अनुसूचित जाती व जमातीवरील अन्याय प्रतिबंधक अधिनियमाच्या अॅट्रॉसिटी कायद्यात बदल करण्याचे विधान केले. हे विधान गैर असल्याचा ठपका ठेवत बहुजन संघर्ष सेनेच्यावतीने निषेध करण्यात आला.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, शिरसाठ यांनी कायद्याचा मोठ्या प्रमाणात दुरूपयोग होत आहे, असे त्यांचे म्हणने आहे आणि आत्ता एखाद्याने अॅट्रॉसिटीची तक्रार दाखल केली असता आरोपीला तत्काळ अटक होणार नाही. त्या तक्रारीची चौकशी ही अधिकाऱ्यामार्फत होईल. त्यानंतर त्या आरोपीला अटक होइल. हे पीडितांसाठी अन्यायकारक आहे. आरोपीला अटक नाही झाली तर आरोपी त्या पीडितांवर दबाव टाकून तक्रार मागे घ्यायला लावू शकतो. हा अनुसूचित जाती–जमातीमधील समाजावर अन्याय करणारा निर्णय असल्याचा आरोप करीत या विधानाचा बहुजन संघर्ष सेनेच्यावतीने निषेध करण्यात आला आहे.

अॅट्रॉसिटी कायद्यात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात येऊ नये. अॅट्रॉसिटी कायदा हा अनुसूचित जाती–जमातीवर होणारा अत्याचार रोखण्यासाठी तयार केलेला कायदा आहे. या कायद्यात बदल केल्यास अनुसूचित जाती, जमातींवर मोठ्या प्रमाणात अत्याचार होतील. कायद्याचा धाक राहणार नाही. त्यासाठी कायद्यात कोणताही प्रकारचा बदल करण्यात येऊ नये अशी मागणी करीत कायद्यात बदल करण्याचे वक्तव्य करणाऱ्या मंत्री संजय शिरसाठ यांचा बहुजन संघर्ष सेनेतर्फे निषेधाचे निवदेन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना देण्यात आले.

यावेळी बहुजन संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेव चिखलीकर, मिलिंद जोंधळे, संतोष दुन्डे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पोलीस उपनिरीक्षकपदी निवडीबद्दल सत्कार



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)**– मुखेड तालुक्यातील उंद्री (प.दे.) येथील ज्येष्ठ नागरिक तथा माजी उपसरपंच हणमंतराव हौसाजीराव गन्लेवार यांचे सुपुत्र संज्योत हणमंतराव गन्लेवार यांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर महाराष्ट्र राज्यसेवा आयोगाच्या ग्रुप–'ब' परीक्षेत यश संपादन करत पोलीस उपनिरीक्षकपदी यश मिळविले आहे. त्यांच्या या यशाबद्दल परिसरात विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर पोलीस पाटील सविता विजयकुमार वादे यांनी संज्योत गन्लेवार यांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पुष्पगुच्छ, शाल–श्रीफळ देऊन गौरव केला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द, कष्ट आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर स्पर्धा परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण होऊ शकतात, अशा शब्दांत मान्यवरांनी कौतुक केले.

# स्वातंत्र्यवीर भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या स्मृत्यर्थ अमर बलिदान दिन कार्यक्रमाचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– देशाच्या स्वांतत्र्यासाठी आपले बलिदान दिलेले स्वांतत्र्यवीर भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांचा अमर बलिदान दिन कार्यक्रमाचे आयोजन २३ मार्च २५ रोजी करण्यात आले आहे.




जय भारत माता सेवा समितीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या सानिध्यात यंदा काशी (वाराणशी) येथे कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाची जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली असून, या कार्यक्रमासाठी एक लाखपेक्षा अधिक देशभक्त उपस्थित राहणार आहेत. लातूर जिल्ह्यातील उदगीर मार्ग नांदेड जिल्ह्यातील नांदेड तालुक्यातील गुंडेगाव येथे १९ मार्च रोजी या देशभक्तांचे आगमन होणार आहे.

या कार्यक्रमास महान क्रांतिकारी शहीद स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित राहणार असून, यामध्ये चंद्रशेखर आझाद यांच्या कुटुंबातील सदस्य अमित आझाद तिवारी, भगत सिंग यांच्या कुटुंबातील सदस्य यादविंदर सिंग संधू, राजगुरु यांच्या कुटुंबातील सदस्य, सत्यशील राजगुरू अशफाकुल्ला यांच्या कुटुंबातील सदस्य, अलक उल्ला खान, उदम सिंग यांच्या कुटुंबातील सदस्य, हरपाल सिंग सुनम, झाशी राणी लक्ष्मीबाई यांच्या कुटुंबातील सदस्य सुनील गोपाल राव, सुखदेव यांच्या कुटुंबातील सदस्य अशोक थापर, कित्तूर राणी चन्नम्मा यांच्या कुटुंबातील सदस्य सोमशेखर देसाई, सांगोली रायण्णा यांच्या कुटुंबातील सदस्य, करवीरअप्पा रगन्ननवार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत, असे संयोजकांच्यावतीने कळविण्यात आले आहे.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

## घामाच्या ग्रंथी जास्त सक्रिय झाल्याने येतो जास्त घाम, डॉक्टरांनी सांगितला उपाय...



डॉ. अशोक म्हात्रे, मुंबई

**मी अशा अनेक रुग्णांना पाहतो ज्यांना तळहात, तळपाय आणि काखेत जास्त घाम येतो. ही स्थिती घामाच्या ग्रंथी जास्त सक्रिय झाल्यामुळे उद्भवते. सैल कपडे घालून, घामरोधके वापरून आणि तणाव व आहारावर नियंत्रण ठेवून ही स्थिती नियंत्रणात ठेवता येते. जरी या स्थितीमुळे सहसा कोणताही गंभीर धोका नसतो, तरी त्यामुळे अस्वस्थता, आत्मविश्वासात घट आणि सामाजिक जीवनावर परिणाम होऊ शकतो.**

### हायपरहायड्रोसिस : अतिघाम येण्याचा आजार

घाम येणे हे शरीराचे एक सामान्य कार्य आहे. जेव्हा शरीराचे तापमान वाढते, तेव्हा घाम शरीराला थंड करण्यास मदत करतो. संपूर्ण शरीरात असलेल्या घाम ग्रंथी हे कार्य करतात. जेव्हा या घाम ग्रंथी जास्त सक्रिय होतात, तेव्हा व्यक्तीला सामान्यपेक्षा जास्त घाम येऊ लागतो. कधीकधी उष्ण हवामानात किंवा शारीरिक हालचालींशिवायही जास्त घाम येऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते, या स्थितीचे दोन प्रकार आहेतः प्रायमरी हायपरहायड्रोसिस आणि सेकंडरी हायपरहायड्रोसिस.

### हायपरहायड्रोसिस का होतो?

- अनुवांशिक कारणे : अनेक प्रकरणांत या समस्येमागे कौटुंबिक इतिहास असतो. जर आई- वडिलांना किंवा कुटुंबातील सदस्याला ही स्थिती असेल, तर मुलाला ती होण्याची शक्यता जास्त असते.
- हार्मोनल बदल : थायरॉईडच्या समस्या, रजोनिवृत्ती किंवा हार्मोनल असंतुलनामुळे देखील जास्त घाम येऊ शकतो. हे स्त्रियांमध्ये अधिक घडते.
- ताण आणि चिंता : चिंता, काळजी किंवा तणावामुळे शरीराची मज्जासंस्था जास्त सक्रिय होऊ शकते, ज्यामुळे घामाचे उत्पादन वाढते.
- विशिष्ट आजार : मधुमेह, लठ्ठपणा, संसर्ग किंवा काही मज्जासंस्थेच्या आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना देखील जास्त घाम येण्याची शक्यता असते.
- विशिष्ट औषधांचे दुष्परिणाम : काही विशिष्ट औषधांचा दुष्परिणाम म्हणून देखील जास्त घाम येऊ शकतो.

### व्यवस्थापन कसे करावे?

- काही सोपे उपाय करून जास्त घामावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येते.
- हलके आणि सैल कपडे घाला : बाधित व्यक्तींनी सुतीसारखे हलके आणि सैल कपडे घालावेत. यामध्ये घाम कमी येतो आणि त्वचा लवकर सुकते.
- अँटीपर्स्पिरंट वापरा : योग्य आणि सुरक्षित अँटीपर्स्पिरंट किंवा विशेष रोल-ऑन उत्पादन शोधण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या. यामुळे घामाचे उत्पादन नियंत्रित करण्यास मदत होऊ शकते.
- संतुलित आहार घ्या : मसालेदार पदार्थ, कॅफीन आणि अल्कोहोलचे सेवन टाळा.
- तणाव व्यवस्थापित करा : तणावामुळे देखील जास्त घाम येऊ शकतो. तणाव व्यवस्थापित करण्यासाठी, योग, ध्यान आणि नियमित व्यायामाचा प्रयत्न करा.

### हायपरहायड्रोसिसची लक्षणे

- हाताचे तळवे आणि पायांच्या तळव्यांना वारंवार घाम येणे.
- काखेत आणि चेहऱ्यावर जास्त घाम येणे. घामामुळे कपडे ओले होणे.
- घामामुळे त्वचेची जळजळ किंवा बुरशीजन्य संसर्ग होणे. सोशल किंवा प्रोफेशनल परिस्थितीत अस्वस्थ वाटणे.

### सल्ला घेणे महत्त्वाचे

हायपरहायड्रोसिस ही केवळ हवामान किंवा उष्णतेशी संबंधित समस्या नाही. कधीकधी हार्मोनल बदल, तणाव किंवा इतर वैद्यकीय परिस्थिती देखील यामागे कारणीभूत असू शकतात. त्यामुळे, जर जास्त घाम येण्याची समस्या दीर्घकाळ टिकून राहिली, तर डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. डॉक्टर मूळ कारण शोधून आराम देऊ शकतात.




### उपचार पद्धती

तुमचे डॉक्टर वैद्यकीय उपचारांची शिफारस करू शकतात, जसे कीः औषधी अँटीपर्स्पिरंट्स, आयंटोफोरेसिस थेरपी किंवा बोटॉक्स इंजेक्शन्स. गंभीर प्रकरणांमध्ये शस्त्रक्रिया उपचार. या स्थितीचे लवकर निदान आणि उपचार केल्यास हायपरहाइड्रोसिस प्रभावीपणे नियंत्रित करता येतो, ज्यामुळे व्यक्ती सामान्य जीवन जगू शकते.

तंबाखू, फॅमिली हिस्ट्री, काही औषधे...

## कोणते घटक वाढवतात किडनी कॅन्सरचा धोका?



**किडनी कॅन्सर हा किडनीच्या नलिकांमधील पेशींच्या असामान्य वाढीमुळे होतो. याला रीनल सेल कार्सिनोमा (RCC) असेही म्हणतात. बहुतेक रुग्णांना धोका वाढवणाऱ्या घटकांची माहिती नसते आणि ही परिस्थिती देशभरात आहे. मूत्रपिंडाच्या कर्करोगाचे नेमके कारण अज्ञात असले तरी, तंबाखू, फॅमिली हिस्ट्री आणि काही औषधे यांसारखे काही घटक धोका वाढवतात, असे दिसून आले आहे. या घटकांचे जीवनशैली, वैद्यकीय आणि अनुवांशिक प्रभावांमध्ये वर्गीकरण केले जाते.**

### किडनी कॅन्सरची इतर कारणे...

- दीर्घकालीन किडनी रोग : जरी तुम्ही डायलिसिसवर नसाल, तरीही दीर्घकालीन किडनी रोगामुळे या कॅन्सरचा धोका वाढतो. ज्याप्रमाणे उच्च रक्तदाब किंवा मधुमेहामुळे किडनीला नुकसान पोहोचते, त्याचप्रमाणे ते दीर्घकालीन दाह आणि पेशींच्या वारंवार दुरुस्तीसाठी पोषक वातावरण तयार करतात, ज्यामुळे कर्करोगजन्य उत्परिवर्तनाचा धोका वाढतो.
- विशिष्ट औषधांचा वापर : असे पुरावे आहेत की डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय मिळणाऱ्या (ओव्हर-द-काउंटर) काही वेदनाशामक औषधांच्या अतिवापरामुळे किडनी कॅन्सरचा धोका वाढतो. विशेषतः फेनासेटिन सॉल्ट्स हा एक महत्त्वाचा धोकादायक घटक आहे आणि अनेक देशांमध्ये त्यावर बंदी घालण्यात आली आहे. तथापि, काही अभ्यासांमध्ये डाययुरेटिक्स आणि इतर वेदनाशामक औषधांच्या उच्च डोसचा आणि किडनी कॅन्सरचा संबंध असल्याचेही दिसून आले आहे.
- लिंग आणि वंश : पुरुषांमध्ये किडनी कॅन्सरचा धोका महिलांपेक्षा अंदाजे दुप्पट असतो. याची कारणे पूर्णपणे स्पष्ट नाहीत, परंतु हार्मोनल फरक, धूम्रपानाचा इतिहास आणि व्यावसायिक संपर्क यांचा यात सहभाग असू शकतो.

### किडनी कॅन्सर टाळण्यासाठी तुम्ही काय करू शकता?



- तंबाखूचे सेवन पूर्णपणे सोडा.
- तुमच्या शरीराचे वजन नियंत्रणात ठेवा. तुमचा बीएमआय (BMI) सामान्य मर्यादेत (१८.५–२४.९) ठेवा.
- फळे, भाज्या, संपूर्ण धान्ये यांचा भरपूर समावेश असलेला आणि लाल मांस कमी असलेला आरोग्यदायी, संतुलित आहार घ्या.
- डॉक्टरांच्या मदतीने तुमचा रक्तदाब नियंत्रणात ठेवा.
- काम करताना योग्य खबरदारी आणि काळजी घेऊन व्यावसायिक आणि पर्यावरणीय धोके कमी करा.
- भरपूर पाणी पिऊन शरीरातील पाण्याची पातळी टिकवून ठेवा.
- तुमच्या डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय वेदनाशामक औषधे घेऊ नका.
- तुमच्या कुटुंबाचा वैद्यकीय इतिहास समजून घ्या आणि धोका कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता तुमच्या डॉक्टरांशी बोला.
- तुम्ही वय, लिंग आणि कौटुंबिक इतिहास यांसारखे धोक्याचे घटक बदलू शकत नाही, परंतु जीवनशैलीत हे बदल करून तुम्ही किडनीच्या कर्करोगाचा धोका निश्चितपणे कमी करू शकता.

### जीवनशैलीशी संबंधित धोक्याचे घटक

- तंबाखूचा वापर : तंबाखू हा मूत्रपिंडाच्या कर्करोगासाठी सर्वात महत्त्वाचा आणि सिद्ध झालेला धोक्याचा घटक आहे. तंबाखूमध्ये असलेले कार्सिनोजेन्स (कर्करोग निर्माण करणारी रसायने) रक्तप्रवाहात प्रवेश करतात. जेव्हा मूत्रपिंड मूत्र तयार करण्यासाठी रक्त गाळतात, तेव्हा ही विषारी द्रव्ये मूत्रपिंडात जमा होतात. दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने मूत्रपिंडाच्या पेशींमधील डीएनएला नुकसान पोहोचते. तुम्ही जितका जास्त काळ धूम्रपान आणि तंबाखूचा वापर कराल, तितका तुमचा कर्करोगाचा धोका वाढतो.
- लठ्ठपणा : लठ्ठपणामुळे डीएनएला नुकसान पोहोचवणारा ऑक्सिडेटिव्ह ताण वाढतो. हे हार्मोनल असंतुलन आणि दाहक वातावरण कर्करोगाच्या पेशींच्या वाढीसाठी एक प्रमुख पोषक वातावरण ठरते. लठ्ठपणामुळे उच्च रक्तदाब देखील होतो, ज्यामुळे कर्करोगाचा धोका आणखी वाढतो.
- उच्च रक्तदाब : उच्च रक्तदाब आणि मूत्रपिंडाचा कर्करोग यांच्यात एक मजबूत आणि महत्त्वपूर्ण संबंध आढळला आहे. तथापि यामागील जैविक यंत्रणा अद्याप समजून घेणे बाकी आहे. असे मानले जाते की दीर्घकालीन उच्च रक्तदाबामुळे मूत्रपिंडाच्या नाजूक नेफ्रॉन्समध्ये ऑक्सिडेटिव्ह ताण आणि दीर्घकालीन दाह वाढतो. या नकारात्मक परिणामामुळे कालांतराने मूत्रपिंडाच्या डीएनएला नुकसान पोहोचते. याव्यतिरिक्त उच्च रक्तदाबामुळे दीर्घकालीन मूत्रपिंड रोग (क्रॉनिक किडनी डिसीज) देखील होतो, जो कर्करोगासाठी एक वेगळा धोकादायक घटक आहे.

### वैद्यकीय आणि व्यावसायिक धोक्याचे घटक

- एकक्यूआयर्ड सिस्टिक किडनी डिसीज (ACKD) : ही स्थिती आनुवंशिक पॉलीसिस्टिक किडनी डिसीजपेक्षा वेगळी आहे. ACKD हा एंड-स्टेज रीनल डिसीज असलेल्या रुग्णांमध्ये आणि दीर्घकाळ डायलिसिसवर असलेल्या रुग्णांमध्ये नेहमी दिसतो. खराब झालेल्या मूत्रपिंडांमध्ये हळूहळू द्रवाने भरलेल्या पिशव्या तयार होतात, ज्यांना सिस्ट (cysts) म्हणतात. या सिस्टच्या एपिथेलियल पेशींमधील बदलांमुळे कर्करोग होऊ शकतो. सामान्य लोकांच्या तुलनेत ACKD असलेल्या रुग्णांना किडनीच्या कर्करोगाचा धोका जास्त असतो.
- कौटुंबिक इतिहास आणि आनुवंशिक सिंड्रोम : किडनीच्या कर्करोगाच्या ५ ते ८ टक्के प्रकरणांचा संबंध जेनेटिक म्यूटेशनशी असतो. हेरेडिटरी सिंड्रोममधील काही विशिष्ट जेनेटिक कंडीशन या आजाराचा धोका लक्षणीयरीत्या वाढवते. यात वॉन हिप्पेल-लिंडाऊ (VHL) रोग, हेरेडिटरी पॅपिलरी रीनल सेल कार्सिनोमा, हेरेडिटरी लेयोमायोटोसिस आणि रीनल सेल कॅन्सर (HLRCC) आणि बर्ट-हॉग-ड्यूब सिंड्रोम यांचा समावेश आहे. या सिंड्रोम असलेल्या रुग्णांना आनुवंशिकरित्या उत्परिवर्तित जनुके मिळतात. ज्यामुळे त्यांच्या किडनीच्या कर्करोगाचा धोका वाढतो. या व्यक्तींना लहान वयातच हा कर्करोग होऊ शकतो, कधीकधी दोन्ही किडनीमध्ये. सिंड्रोम नसतानाही किडनीच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास असल्यास धोका वाढतो. जर तुमच्या जवळच्या नातेवाईकाला (आई-वडील, भावंड किंवा मूल) किडनीचा कर्करोग असेल, तर तुम्हाला तो होण्याचा धोका दुप्पट होतो. हे समान जनुके, समान पर्यावरणीय घटक किंवा दोन्ही कारणांमुळे असू शकते.
- व्यावसायिक संपर्क : कामाच्या ठिकाणी काही विशिष्ट औद्योगिक रसायनांच्या दीर्घकालीन संपर्कामुळे मूत्रपिंडाचा कर्करोग होऊ शकतो. मूत्रपिंडे या पदार्थांवर प्रक्रिया करतात आणि त्यांना शरीरात नियंत्रित करतात. यामध्ये ॲस्बेस्टॉस (फुफ्फुसांच्या कर्करोगाचे कारण म्हणून ओळखले जाते, पण त्यामुळे मूत्रपिंडाच्या कर्करोगाचा धोकाही वाढतो.), कॅडमियम (बॅटरी उत्पादन, वेल्डिंग किंवा पेंटिंग यांसारख्या कामांमध्ये गुंतलेल्यांना याच्या संपर्कात येण्याचा धोका जास्त असतो.), सेंद्रिय द्रावके (विशेषतः ट्रायक्लोरोएथिलीन (TCE), जे पूर्वी औद्योगिक ठिकाणी वंगण काढण्यासाठी वापरले जात होते.), तणनाशके आणि बेंझिन (शेती आणि काही रासायनिक उद्योगांमध्ये वापरले जातात.)

## दही खाल्ल्याने वजन कमी होण्यास मदत होते का?

हाडे मजबूत करण्यासाठी आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी ते केव्हा अन् किती खावे?

**भारतीय खाद्यसंस्कृतीत दह्याला एक विशेष महत्त्व आहे. हे केवळ चव वाढवणारे अन्न नाही, तर आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर देखील आहे. दह्यामध्ये कॅल्शियम, प्रथिने, जीवनसत्त्वे आणि चांगले जिवाणू (बॅक्टेरिया) असतात, जे शरीराला अनेक फायदे देतात. नियमितपणे दही खाल्ल्याने पचनसंस्था सुधारते, रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि हाडे मजबूत होतात. दही एक नैसर्गिक प्रोबायोटिक अन्न आहे जे आतड्यांमधील चांगले जिवाणू (बॅक्टेरिया) वाढवण्यास मदत करते. दही खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते आणि शरीराची रोगप्रतिकारशक्ती मजबूत होते. म्हणूनच आपल्या रोजच्या आहारात दह्याचा समावेश करण्याची शिफारस केली जाते. अन्नाची चव वाढवण्याव्यतिरिक्त, दही आरोग्य आणि सौंदर्य देखील सुधारते.**

### दही खाण्याचे फायदे

- दही आतड्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर : दही प्रोबायोटिक्सचा एक उत्तम स्त्रोत आहे. दह्यामधील चांगले बॅक्टेरिया आतड्यांमधील मायक्रोबायोम संतुलित ठेवण्यास मदत करतात, ज्यामुळे पचनक्रिया सुधारते. नियमितपणे दही खाल्ल्याने गॅस, अपचन आणि बद्धकोष्ठता यांसारख्या समस्यांपासून आराम मिळू शकतो.
- दही हाडे मजबूत करते : प्रोबायोटिक्सने समृद्ध असलेले दही कॅल्शियम, व्हिटॅमिन डी, फॉस्फरस आणि प्रथिनांचा एक उत्तम स्त्रोत आहे. दही खाल्ल्याने दात आणि हाडे मजबूत होतात. ते हाडांची घनता वाढवून हाडे मजबूत करते, ज्यामुळे वाढत्या वयानुसार सांधेदुखी, ऑस्टिओपोरोसिस आणि फ्रॅक्चर यांसारख्या हाडांशी संबंधित समस्यांचा धोका कमी होतो.
- रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी दही खा : दही रोगप्रतिकारशक्ती वाढवते आणि आतड्यांचे आरोग्य सुधारते, म्हणूनच त्याला सुपरफूड म्हटले जाते. दह्यामध्ये असलेले प्रोबायोटिक्स (चांगले बॅक्टेरिया), कॅल्शियम, झिंक आणि व्हिटॅमिन बी १२ सारखे पोषक घटक शरीराची रोगप्रतिकारशक्ती मजबूत करण्यास मदत करतात. दही खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते आणि संसर्गाशी लढण्याची क्षमता वाढते.
- दही पचनसंस्था सुधारते : जर एखाद्याला जड जेवणानंतर पोटात अस्वस्थता जाणवत असेल, तर दही पचनक्रिया सुलभ करण्यास मदत करू शकते. ते पोटातील पीएच पातळी नियंत्रित करते आणि अपचन व छातीत जळजळ यामुळे होणारी अस्वस्थता कमी करते, ज्यामुळे बद्धकोष्ठता, आम्लपित्त आणि पोट फुगणे यांसारख्या समस्या टाळता येतात. दही पोटाला थंडावा देते. पचनासाठी ताजे, कमी चरबीयुक्त दही खाणे हा एक उत्तम पर्याय आहे.
- दही वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत करते : दह्यामध्ये असलेले प्रथिने, कॅल्शियम आणि प्रोबायोटिक्स वजन कमी करण्यासाठी उपयुक्त ठरतात. दह्यामध्ये प्रथिने भरपूर प्रमाणात असतात, ज्यामुळे बराच वेळ पोट भरल्यासारखे वाटते आणि भूक कमी लागते. दह्यामुळे पचनक्रिया सुधारते आणि चयापचय क्रिया वाढते. नाश्त्यामध्ये किंवा दुपारच्या जेवणात ताजे, कमी चरबीचे दही खाल्ल्याने शरीरातील चरबी कमी होण्यास आणि वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.
- दही नैसर्गिक प्रोबायोटिक्सचा स्त्रोत : दही एक उत्कृष्ट नैसर्गिक प्रोबायोटिक आहे. त्यात असलेले चांगले बॅक्टेरिया पचनसंस्था, रोगप्रतिकारशक्ती आणि आतड्यांचे आरोग्य सुधारतात. दही आंबवण्याच्या प्रक्रियेद्वारे बनवले जाते, ज्यात जिवंत चांगले बॅक्टेरिया असतात जे पचनक्रिया सुधारण्यास आणि रोगप्रतिकारशक्ती मजबूत करण्यास मदत करतात. नियमितपणे दही खाल्ल्याने शरीराला कॅल्शियम, प्रथिने आणि व्हिटॅमिन बी१२ चे फायदे मिळतात.
- दही खाण्याची योग्य वेळ आणि पद्धत : जर दही योग्य प्रमाणात आणि योग्य वेळी खाल्ले तर ते शरीरासाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकते. विशेषतः उन्हाळ्यात, दही शरीराला थंडावा देण्यास आणि पचनक्रिया सुधारण्यास मदत करते.

# बारामती पोटनिवडणूक लढवतो आणि जिंकून दाखवतो, लक्ष्मण हाकेंचा दावा

**मुंबई(प्रतिनिधी)** –बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. दोन्ही ठिकाणच्या सदस्यांचे अकाली निधन झाल्याने येथे निवडणूक जाहीर झाली असून २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. यापूर्वी राजकीय वातावरण तापल्याचं पाहायला मिळत आहे. बारामती मतदारसंघात ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी थेट पवार कुटुंबीयांवर टीका करत येथील निवडणूक बिनविरोध करण्यास विरोध दर्शवला आहे. सुनेत्रा पवार यांना विधान परिषदेवर घ्यावं असं वक्तव्य लक्ष्मण हाके यांनी केलं आहे. आम्ही ही निवडणूक लढवतो आणि जिंकून दाखवतो असे हाके यानी म्हटलं आहे.

सुनेत्रा पवार यांना विधान परिषदेवर घ्यावं, इथं पवार सोडून विधानसभेला उमेदवार द्यावा असे मत लक्ष्मण हाके यांनी व्यक्त केले आहे. आम्ही निवडणूक लढवतो पण काही जणांच्या पोटात दुखते. सुनेत्रा पवारांना विधान परिषदेवर पाठवा, आम्ही ही निवडणूक लढवतो आणि जिंकून दाखवतो असे हाके यांनी म्हटलं आहे. सुनेत्रा पवार यांना बिनविरोध विधानपरिषदेवर पाठवा. इथं अजित पवार यांच्या घरातील सोडून दुसरा उमेदवार उभा करा असेही हाके म्हणाले. राज्य शासनाच्या अनेक धोरणांच्या विरोधात आम्ही या निवडणुकीला सामोरं जात आहोत. शरद पवार यांना राज्यसभेवर बिनविरोध पाठवलं आहेच. मग सुनेत्रा पवार यांना देखील विधानपरिषदेवर बिनविरोध पाठवा असेही हाके म्हणाले. मी उमेदवार असेन असं नाही, येथील लोकलचा उमेदवार देखील निवडणूक लढवू शकतो असे हाके म्हणाले.

२८ जानेवारीला विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर होणारी बारामतीची निवडणूक बिनविरोध होणार असल्याची चर्चा सुरु असतानाच आता ट्विस्ट पाहायला मिळत आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी निवडणूक लढवण्याची तयारी सुरु केल्याचं दिसत आहे. आपण निवडणूक लढवावी यासाठी बारामतीतील कार्यकर्त्यांकडून मोठा आग्रह असल्याचं ते म्हणाले. तसेच दादांच्या निधनानंतर तिसऱ्या दिवशी शपथविधी होतो, मग आम्हीच त्यांच्या निधनाचं दुःख का व्यक्त करायचं, असंही लक्ष्मण हाके यांनी म्हटलं होतं.

## जालन्यात गॅस एजन्सीचे गोडाऊन फोडून ११० सिलिंडर चोरले; अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल

**जालना (प्रतिनिधी)** – जालना तालुक्यातील रामनगर परिसरात गॅस एजन्सीच्या गोडाऊनमध्ये चक्क गॅस सिलिंडरची मोठी चोरी झाल्याचा प्रकार समोर आला आहे. आनंद भारत गॅस एजन्सीच्या शिवारातील गोडाऊनचे कुलूप तोडून चोरट्यांनी तब्बल ११० गॅस सिलिंडर लंपास केल्याने खळबळ उडाली आहे.

चोरीस गेलेल्या सिलिंडरची अंदाजे किंमत साडेचार लाख रुपयांपेक्षा अधिक आहे. विशेष म्हणजे एकीकडे नागरिकांना गॅस टंचाईचा सामना करावा लागत असताना हा प्रकार घडल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. या प्रकरणी एजन्सीचे व्यवस्थापक सिद्धार्थ आढाव यांनी मौजपुरी पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलिसांकडून या चोरीचा अधिक तपास सुरू आहे.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार रविवारी गॅस एजन्सी बंद असताना मध्यरात्री ही चोरी झाल्याची शक्यता आहे. सोमवारी हा प्रकार उघडकीस आला. या घटनेत जवळपास ९६ घरगुती सिलेंडर तसेच १२ निळ्या रंगाचे व्यावसायिक सिलेंडर आणि ५ किलोचे दोन व्यवसाय सिलेंडर असे एकूण ११० गॅस सिलेंडर चोरीला गेले आहेत, जवळपास ४ लाख ५१ रुपये किमतीचा हा मुद्देमाल चोरीला गेला असून पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली आहे.

पेट्रोलियम मंत्रालयाने सर्व घरगुती गॅस ग्राहकांसाठी ई-केवायसी अनिवार्य केले आहे. गॅस एजन्सीमध्ये जाण्याची गरज नाही. तुम्ही संबंधित ऑईल कंपनीचे अधिकृत ॲप आणि 'adhaar FaceRD' प वापरून घरबसल्या ही प्रक्रिया काही मिनिटांत पूर्ण करू शकता. यामुळे तुमची गॅस सबसिडी विनाव्यत्यय सुरू राहील. घरगुती LPG ग्राहकांसाठी ई-केवायसी अनिवार्य करण्यात आले आहे.

# रब्बी हंगामातील सहायक स्तरावरील ई-पीक पाहणी नोंदणीस ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

## ■ महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा



**मुंबई(प्रतिनिधी)**– रब्बी हंगाम २०२५-२६ साठी सुरू असलेल्या सहायक स्तरावरून करावयाच्या ई-पीक पाहणी नोंदणीला ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली.

महाराष्ट्र विधानसभा नियम ४७ अंतर्गत केलेल्या निवेदनात मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, राज्यात सध्या डिजिटल क्रॉप सर्व्हे या पच्या माध्यमातून ई पीक पाहणी नोंदणी होते. राज्यात रब्बी हंगाम २०२५-२६ अंतर्गत १० डिसेंबर २०२५ ते २४ जानेवारी २०२६ या कालावधीत शेतकरी स्तरावरून पीक नोंदणी सुरू होती. मात्र, पीक पाहणी क्षेत्रापैकी आतापर्यंत केवळ ५५.६९ टक्के इतक्या क्षेत्राची पीक नोंदणी पूर्ण झाली आहे. मात्र, सध्याच्या प्रगतीचा वेग लक्षात घेता ही प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे शक्य नाही. पीक नोंदणी न झाल्याने नैसर्गिक आपत्ती, पीक विमा, पीक कर्ज इ. लाभापासून कोणताही शेतकरी वंचित राहू नये, यासाठी सहायक स्तरावरून करावयाच्या पीक नोंदणीला ३१ मार्च २०२६ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

रब्बी हंगामातील ई-पीक पाहणी नोंदणी १०० टक्के पूर्ण करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्याचेही मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

# एसटी महामंडळात १७,७४२ पदांची कंत्राटी भरती



**मुंबई(प्रतिनिधी)**–एसटी महामंडळात १७,७४२ ड्रायव्हर, कंडक्टर आणि कर्मचाऱ्यांची कंत्राटी भरती केली जाणार आहे. महामंडळाच्या ताफ्यात नव्याने येणाऱ्या ८३०० बसेससाठी ही कंत्राटी भरती केली जाईल. नियमित कर्मचाऱ्यासाठी अर्थ खात्याकडे अर्ज पाठविण्यात आल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मात्र, तोपर्यंत या बसेस चालाव्या म्हणून ही कंत्राटी पद्धतीने भरती करावी लागत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सामान्य प्रवाशांना उत्तम सेवा देणे हेच एसटीचे तसेच सर्व कर्मचाऱ्यांचे अंतिम उद्दिष्ट आहे. त्यामुळे काम करताना चालक-वाहकांना भेडसावणाऱ्या दैनंदिन अडचणी, आगारस्तरावरील निर्णयप्रक्रिया तसेच शिस्तभंग कारवाईच्या बाबतीत न्याय्य आणि पारदर्शक पद्धतीने काम करण्याचे निर्देशही सरनाईक यांनी कर्मचारी संघटनेच्या बैठकीतून दिले आहेत.

एसटी कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यां-सोबत मंत्री सरनाईक यांची काल सकारात्मक चर्चा झाली. यावेळी, एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी प्रताप सरनाईक यांनी विधान भवनात सोमवारी महत्त्वपूर्ण बैठक बोलावली होती. त्यानंतर, आज विधानसभेत बोलताना त्यांनी नव्याने कंत्राटी भरती केली जाणार असल्याचे सांगितले. लवकरच मुंबईत ३० स्लिपींग कोच बसेस असतील तर १७० बैठ्या खुर्च्यांच्या वोल्वो बसेसही दाखल होती, या दोन्ही प्रकारच्या बसेस मुंबईसाठी मागविण्यात आल्या आहेत. महामंडळाच्या ताफ्यात आम्ही लवकरच ८३०० बसेस समाविष्ट करणार आहोत. त्यासाठी, एसटी महामंडळात १७,७४२ ड्रायव्हर, कंडक्टर आणि कर्मचाऱ्यांची कंत्राटी भरती केली जाणार आहे. महामंडळाच्या ताफ्यात नव्याने येणाऱ्या ८३०० बसेससाठी ही कंत्राटी भरती केली जाईल, असे सरनाईक यांनी विधानसभेत बोलताना सांगितले.

महायुती सरकारने एसटीतील प्रवाशांबाबत गेल्या काही महिन्यांपासून अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना राज्य परिवहन सेवेच्या बसेसमधून मोफत प्रवास करता येईल, अशी घोषणा केली होती. यानंतर राज्यातील महिलांना हाफ तिकिटात एसटीचा प्रवास करता येईल, अर्थात अर्ध्या तिकिटात महिलांना प्रवास करण्याची मुभा दिली. यानंतर आता एसटीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यापुढे पत्नीसह वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

# ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला सुरूवात

**मुंबई (प्रतिनिधी)** –भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. या हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे, या दृष्टीने केंद्र शासनाने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे.

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधीत संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू कोणाला स्वखुशीने ही हस्तलिखिते राज्य शासनाकडे सुपूर्द करावयाची झाल्यास शासन ती स्वीकारेल.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्रासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असून राज्य नोडल अधिकारी म्हणून सुजितकुमार उगले, संचालक, पुराभिलेख संचालनालय कार्य पाहणार आहेत. तर अंजली ढमाळ, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था, तथा अभिजात मराठी भाषा कक्षा, मराठी भाषा विभाग या सहनोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

या सर्वेक्षणासाठी ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत त्रूप इहरीरीं हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.


## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय किरकोळ
दिवाणी अर्ज क्रमांक ४९/२०२६
रेखा व ईतर विरुध्द निरंक

अर्जदार -१. रेखा भ्र. सायबु शेळके, वय - ४० वर्षे, २. सचिन पि. सायबु शेळके, वय २१ वर्षे, ३. संदिप पि. सायबु शेळके, वय - १८ वर्षे, ४. धुरपतबाई भ्र. होनाजी शेळके, वय- ८० वर्षे, सर्व रा. रुद्रापुर ता. बिलोली जि. नांदेड

विरूध्द निरंक

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत सायबु पि. होनाजी शेळके यांचे अर्जदार क्र. १ हे पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ हे मुले आहेत. तसेच अर्जदार क्र.४ ही आई आहे. अर्जदार हे मौजे रुद्रापुर ता. बिलोली जि. नांदेड येथील रहिवाशी आहेत. मयत सायबु पि. होनाजी शेळके यांचा मृत्यु दिनांक दि. २६/१०/२०२० रोजी मौ. रुद्रापुर येथे झाला आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत सायबु पि. होनाजी शेळके यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक ०६/०४/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील. आज दि. २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली


## राजू बाविस्कर यांच्या 'काळ्यानिळ्या रेषा'ला साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर

**नवी दिल्ली(प्रतिनिधी)**– साहित्य अकादमीतर्फे देण्यात येणाऱ्या २०२५ या वर्षासाठी प्रतिष्ठेच्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. देशातील मान्यताप्राप्त २४ भाषांमधील उत्कृष्ट साहित्यकृतींना यंदाचे साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाले असून मराठी भाषेतील 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मकथेसाठी लेखक राजू बाविस्कर यांना पुरस्कार जाहीर झाला आहे.

साहित्य अकादमी ही भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत स्वायत्त राष्ट्रीय संस्था असून भारतीय भाषांमधील साहित्याच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविते. दरवर्षी अकादमीकडून विविध भाषांतील उत्कृष्ट साहित्यकृतींची निवड करून त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

मराठी साहित्यविश्वात महत्त्वपूर्ण ठरलेल्या 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मकथेत लेखकाने आपल्या आयुष्यातील अनुभव, सामाजिक वास्तव, संघर्ष आणि वैचारिक प्रवास यांचे प्रभावी चित्रण केले आहे. या साहित्यकृतीला मिळालेल्या पुरस्कारामुळे मराठी साहित्यविश्वाचा गौरव वाढला आहे.

यंदाच्या पुरस्कारांमध्ये काव्यसंग्रह, कादंबरी, कथासंग्रह, निबंध, साहित्यिक समीक्षा, आत्मकथा आणि संस्मरण अशा विविध साहित्य प्रकारांतील विविध पुस्तकांची निवड करण्यात आली आहे. देशातील विविध भाषांमधील साहित्यिक परंपरेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या साहित्यकृतींना तज्ज्ञांच्या समितीद्वारे निवडण्यात आले आहे.

# कौशल्य विकासातून रोजगाराच्या नव्या संधीसाठी राज्यात ३० लाख युवकांसाठी विशेष योजना

**मुंबई(प्रतिनिधी)** –कौशल्य विकास क्षेत्रात व्यापक बदल घडवून आणण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. राज्यातील युवक-युवतींना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य विकास विभागाकडून अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यात पुढील दोन वर्षांत युवकांना रोजगार आणि उद्योजकतेच्या अधिकच्या नव्या संधी निर्माण होतील. असा विश्वास व्यक्त करत कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी राज्यात कौशल्य विकासातून रोजगाराच्या नव्या संधीसाठी ३० लाख युवक-युवतींसाठी विशेष योजना सुरू करण्यात आली असल्याचे सांगितले.

विधान परिषदेत सदस्य विक्रांत पाटील नियम ९२ अन्वये उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेला उत्तर देताना मंत्री लोढा बोलत होते.

मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले, कौशल्य विकास क्षेत्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यात मॉडेल करिअर सेंटरच्या माध्यमातून २०२५-२६ या वर्षात १ लाख १२ हजारावर युवकांना वैयक्तिक मार्गदर्शन करण्यात आले आहे. राज्यातील युवकांना परदेशात रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी मुंबई विद्यापीठात स्वामी विवेकानंद कौशल्य विकास इंटरनॅशनल अॅकॅडमी सुरू करण्यात आली आहे. याशिवाय राज्यात आणखी सहा ठिकाणी अशा अॅकॅडमी सुरू करण्यात आल्या असून या अॅकॅडमीमध्ये विविध परदेशी भाषांचे प्रशिक्षण दिले जात आहे. याबरोबरच ईव्ही तंत्रज्ञान, रोबोटिक्स आणि ॲडव्हान्स वेल्डिंगसारख्या आधुनिक कौशल्यांचेही प्रशिक्षण दिले जात आहे.

परदेशात रोजगारासाठी जाणाऱ्या युवकांची खासगी एजन्सीकडून फसवणूक होवू नये यासाठी राज्य शासनमार्फत परकीय कंपन्यांशी कौशल्य विकास विभागामार्फत थेट समन्वय साधून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. तसेच आयटीआय आणि उद्योग क्षेत्रात समन्वय साधून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत, असेही त्यांनी सांगितले.

कौशल्य विकासासाठी निधीची कमतरता नसल्याचे सांगत मंत्री लोढा यांनी सांगितले की, एडीबी बँकेकडून ४२०० कोटी रुपये, तर जागतिक बँकेकडून १४०० कोटी रुपयांचा निधी कौशल्य विकास विभागाला मिळाला आहे. या निधीतून राज्यातील सर्व आयटीआयचे आधुनिकीकरण करण्यात येत असून पुढील तीन वर्षांत प्रत्येक आयटीआयचे नूतनीकरण करण्याबरोबरच विद्यार्थ्यांसाठी नवीन वसतीगृहासाठी सुविधाही उभारण्यात येणार आहेत.

राज्यातील आयटीआयमध्ये इंडस्ट्रियल मॅनेजमेंट कमिटी गठित करून यामध्ये ३ हजार ७०० ट्रस्टींची नियुक्ती करण्यात आली आहे. उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ, चार्टर्ड अकाउंटंट आणि सामाजिक संस्थांचे प्रतिनिधींचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. तसेच आयटीआयमध्ये टेक्निकल डायरेक्टरची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.


## कागदपत्रं हरवले

माझे अरविंद सत्यनारायण दरबस्तवार या नावाचे सर्व्हीस बुक व वात्सल्यनगर सोसायटी एन.डी.-२ या घराचे कागदपत्रं व स्टेट बँक ऑफ इंडिया समोरील शटर असलेल्या जागेची मूळ रजिस्ट्रीस व इतर महत्त्वाचे कागदपत्र अण्णाभाऊ साठे चौक सिडको ते लातूर फाटा दरम्यान प्रवासात हरवले आहे. ज्यांना कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता- अरविंद सत्यनारायण दरबस्तवार रा. वात्सल्य नगर सोसायटी सिडको, नवीन नांदेड

**मो. ९५०३५७०१२४**


# दिल्लीच्या राष्ट्रीय रक्षा महाविद्यालय शिष्टमंडळाने घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

## ■ शिष्टमंडळात रशिया, टांझानिया, नायजेरिया, नेपाळ, ओमान आणि इंडोनेशिया सैन्य अधिकारी



**मुंबई(प्रतिनिधी)**–दिल्लीस्थित राष्ट्रीय सुरक्षा महाविद्यालयाच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधान भवन येथे भेट घेतली. शिष्टमंडळात रशिया, ओमान, नायजेरिया, नेपाळ, इंडोनेशिया, टांझानिया या देशांमधील भूदल, नौदल आणि वायुदलातील सैन्य अधिकाऱ्यांचा समावेश होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी शिष्टमंडळाला महाराष्ट्रात सुरू असलेल्या विविध विकास प्रकल्पांची माहिती दिली. तसेच महाराष्ट्राची वेगाने वाटचाल करणारी अर्थव्यवस्था, सक्षम सागरी सुरक्षा, संपर्क यंत्रणा, तसेच राज्यात मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या गुंतवणुकीची यशोगाथा सांगितली.

याप्रसंगी संवादादरम्यान शिष्टमंडळातील अधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे निरसन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

यावेळी शिष्टमंडळात मेजर जनरल (निवृत्त) हरकिरत सिंग, ब्रिगेडियर संजीव सहारण, अरविंद खेमटा, जे एस गिल, बीर विक्रम, नेपाळच्या लष्करातील कर्नल पदावरील अधिकारी मनोज थापा, रशियाचे अलेक्सी ग्रीशेव, इंडोनेशिया येथील फौजी नर्दिन, नायजेरियाचे स्टॅन्ली लुकपाटा ओकपुटू, टांझानिया येथील सादिकी एलियस मिहायो, ओमानचे हिलाल अब्दुल्ला हमीद अल महधोरी आदी उपस्थित होते.

# सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना पत्नीसह वर्षभर मोफत प्रवास

**मुंबई(प्रतिनिधी)**–एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी विधानभवन येथे महत्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत कर्मचारी संघटनांनी मांडलेल्या तक्रारी व मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाला आवश्यक निर्देश देण्यात आले. तसेच एसटीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यापुढे पत्नीसह वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

एसटी महामंडळात कार्यरत असलेल्या सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाने चालक-वाहकांवरील कारवाई, आगार व्यवस्थापनातील अडचणी तसेच काही प्रशासकीय प्रक्रियांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे मंत्री सरनाईक यांचे लक्ष वेधले होते. या पार्श्वभूमीवर संघाचे अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्री सरनाईक यांनी सकारात्मक चर्चा केली. कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा हीच महामंडळाची भूमिका असल्याचे यावेळी सांगितले.

तीन वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या पर्यवेक्षक व अधिकाऱ्यांच्या बदल्या

मंत्री सरनाईक यांनी एकाच ठिकाणी तीन वर्षांपेक्षा अधिक काळ सेवा बजावणाऱ्या पर्यवेक्षक व अधिकाऱ्यांची इतर ठिकाणी बदली करण्याचे निर्देश एसटी प्रशासनाला दिले. या संदर्भात कर्मचारी संघटनांच्या भावना तीव्र असून, या प्रक्रियेची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या सूचनाही दिल्या.


## टी. सी. हरवली

माझी आमरीन खानम बशीर खान पठाण या नावाची इयत्ता १० वी ची टी. सी. शिवाजीनगर ते देगलूर नाका दरम्यान प्रवासात गहाळ झाली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा. योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

संपर्क पत्ता-आमरीन खानम बक्षीर खान पठाण रा. तेहरानगर, नांदेड मो. ९८५०७००५२५

## Change In Name

My Old Name is **Varsh Shankar Pilgunde** which now I am changing as New Name **Varsha Shankar Pilgunde** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - Near hanuman mandir lalwandi Post gadga, dist. Nanded Maharashtra 431722**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# नांदेड जिल्हा परिषदेच्या २३ कोटी २६ लक्ष रुपयांच्या अर्थसंकल्पास मंजुरी

## सक्षम महिला, आधुनिक शेती, शिक्षण व आरोग्यातून गावांचा सर्वांगीण विकास

**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प मंगळवारी सादर करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या उत्पन्नातून तयार करण्यात आलेल्या सन २०२५-२६ च्या सुधारित व सन २०२६-२७ च्या मूळ अर्थसंकल्पास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी मान्यता दिली. यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या बैठकीत हा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी हा अर्थसंकल्प सादर केला. यावेळी मंचावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, लेखाधिकारी विशाल हिवरे यांची उपस्थिती होती.

अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात शिक्षण विभागासाठी १ कोटी १६ लक्षची तरतूद करण्यात आली असून, खेळाचे मैदान विकसित करणे व क्रीडा साहित्य पुरविण्याकरिता २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. करिअर मार्गदर्शन व अकरावी-बारावीतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी प्रज्ञा प्रकल्प राबविण्यात येणार असून यासाठी ३२ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

माळेगावसह इतर यात्रेसाठी ७५ लाख रुपयांची तरतूद आहे. ग्रामीण भागात होणारे श्वानदंश व साप चावून होणारे मृत्यू रोखण्यासाठी आवश्यक इंजेक्शनकरिता २० लक्ष, प्राथमिक आरोय केंद्रातील अत्याधुनिक प्रसूती कक्षाकरिता २० ची तरतूद करण्यात आली आहे. या शिवाय आरोग्य केंद्र NQS करणे, आरोग्य दूत योजना राबविणे, क्षयरोगमुक्त गाव अशा वैशिष्ट्यपूर्ण योजना राबविण्याकरिता एकूण ४५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

अनुसूचित जाती- जमाती व दुर्बल घटकांसाठी १ कोटी ५६ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य, चारचाकी वाहन खरेदीसाठी अनुदान, विद्यार्थ्यांना लॅपटॉपसाठी मदत तसेच गर्भवती माता व बालकांच्या सुरक्षेसाठी ॲनोमली स्कॅनसाठी ४० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दिव्यांगांसाठीही १ कोटी १६ लक्ष रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

शेती क्षेत्रात ड्रोन खरेदीसाठी १२ लक्ष, जैविक कीटकनाशक प्रयोगशाळेसाठी १२ लक्ष, सूक्ष्म प्रक्रिया उद्योगांसाठी १६ लक्ष तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना १८ लक्ष रुपयांची मदत देण्यात येणार आहे.



प्रिसीजन फार्मिंग योजनेसाठी ११ लक्ष रुपयांची तरतूद आहे. पशुधन विभागाकरिता ९० लक्ष रुपये तरतूद ठेवण्यात आली आहे. यामध्ये औषधी, ईमारत दुरुस्ती, लस वाहतूक याचा समावेश आहे. लघु पाटबंधारे विभागासाठी ४५ लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

महिला व बाल विकासासाठी ७८ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना गणवेश, ड्युअल डेस्क व भांडी पुरविणे तसेच घटस्फोटित व विधवा महिलांच्या पाल्यांना सहाय्य देण्यात येणार आहे. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन तसेच प्लास्टिक प्रक्रिया प्रकल्पांसाठी ५७ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पाणीपुरवठा विभागासाठी तब्बल ४ कोटी ६५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाला गती देण्यासाठी ७८ लक्ष रुपयांचा निधी देण्यात आला असून ग्रामविकासाला चालना मिळणार आहे.

# बनावट कागदपत्र तयार करून शेतमालकाची फसवणूक

### नांदेड तालुक्यातील धनेगाव येथील प्रकार



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरापासून जवळच असलेल्या धनेगाव येथे काही जणांनी संगनमत करून मूळ शेत मालकाच्या जमिनीचे बनावट कागदपत्र तयार केले. त्या जमिनीवरील प्लॉट विक्री करून फसवणूक शेतमालकाची करण्यात आली. हा प्रकार ४ मे २०२४ रोजी घडला होता.

धनेगाव येथे उत्तम संभाजी शिंदे (वय ६७) यांची गट क्रमांक ४९/१ मध्ये दोन एकर २० आर शेती आहे. या शेताचे बनावट कागदपत्र तयार करून आरोपी शिवाजीनगर, नांदेड येथील कृष्णा प्रभाकर कुलकर्णी, विनायक प्रभाकर कुलकर्णी, वसुंधरा प्रभाकर कुलकर्णी आणि तत्कालीन तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांना हाताशी धरून बनावट कागदपत्राद्वारे सदर जमिनीतील प्लॉट विक्री करून उत्तम शिंदे यांची फसवणूक केली. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर उत्तम शिंदे यांनी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून वरील सर्व जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक भोसले करत आहेत.

# दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांना अटक

### विमानतळ पोलिसांची कारवाई, सहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत सांगवी आसना बायपास ते मल्हार चौक रस्त्यावर अंधारात दबा धरून दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या सहा जणांना विमानतळ पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून दरोडा टाकण्याचे साहित्य आणि एक चारचाकी वाहन असा सहा लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून विमानतळ ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.



शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाहिजे व फरार आरोपींच्या शोधात पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांनी आपले गुन्हे शोध पथक सक्रिय केले. बायपास ते मल्हार चौक जाणाऱ्या रस्त्यावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेले चोरटे दबा धरून बसल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक शेंडगे यांना मिळाली. त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने यांना ही माहिती कळवून आपले पथक त्या ठिकाणी रवाना केले. पथकाने शिताफीने मल्हार चौक परिसरात दबा धरून बसलेले रामधन गंगाराम अंतळकर (वय २७ रा. नांदुसा ता. अर्धापूर), राजेश गंगाराम अंतळकर (वय ३१), अक्षय बालाजी भोसले (वय १९ रा. नरापूर ता. पूर्णा), शिवाजी पंडित अंतळकर वय ४० रा. पावडेवाडी नांदेड), संदीप संजय हारगावकर (वय १९ रा. पावडेवाडी नांदेड), विष्णू बंडू भोसले (वय १९ पावडेवाडी नांदेड) हे दरोडा टाकण्याच्या तयारीने कार क्रमांक (एमएच०२ बीझेड ०१३६) ही रस्त्याच्या कडेला लावून थांबले होते. पोलिसांनी त्यापैकी पाच जणांना अटक केली आहे.

# हायवाची दुचाकीला धडक; दुचाकीस्वाराचे शीर धडापासून वेगळे

**बाऱ्हाळी (प्रतिनिधी)** –भाजीपाला आणण्याकरिता म्हणून बाऱ्हाळीकडे निघालेल्या एका २८ वर्षीय दुचाकीस्वारास हायवाची धडक बसली. या अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाल्याची धक्कादायक घटना सोमवार, दि. १६ मार्च २०२६ रोजी निवळी शिवारात घडली.



मुखेड तालुक्यातील भेंडेगाव (बु.) येथील रहिवासी असलेला संतोष रामराव कांबळे (वय २८ वर्षे) हा भाजीपाला आणण्याकरिता म्हणून सोमवार, दि. १६ मार्च रोजी दुचाकी क्रमांक एम.एच. २६ सी एक्स १३८४ या दुचाकीने बाऱ्हाळीकडे दुपारी अंदाजे ३:३० वाजता निघाला होता.

नांदेड-बिदर जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग १६१ अ वरती असलेल्या निवळी शिवारातील पुलावर पोहचताच काळी माती घेऊन जाणाऱ्या एम. एच २४ ए बी ८८८० या क्रमांकाच्या हायवाने दुचाकीला मागून धडक दिल्याचे समजते. हा अपघात इतका भीषण होता की, अपघातात दुचाकीस्वाराच्या डोक्याचा चेंदामेंदा झाला असून, त्याच्या कवटीचा भाग हा धडापासून वेगळा झाला आहे. तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. मयत संतोष कांबळे यांच्या पाश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी (४ वर्षे), एक मुलगी (२ वर्षे) असा परिवार आहे.

# अर्धापूर येथे आज पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अर्धापूरच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. १८ मार्च रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अर्धापूर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापनामध्ये रोजगार व नोकरीच्या संधीसाठी मुलाखती घेण्यात येणार असून, जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी बुधवार १८ मार्च २०२६ सकाळी १० वा. पासून औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अर्धापूर येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे.

# प्राचार्य डॉ. गणेश जोशी यांना मातृशोक

**नांदेड (प्रतिनिधी)**– एमजीएम वृत्तपत्र महाविद्यालयाचे



प्राचार्य तथा दैनिक लोकपत्र वृत्तपत्राचे आवृत्ती संपादक डॉ. गणेश जोशी यांच्या मातोश्री वनमालाबाई मुरलीधर जोशी यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी धनगर टाकळी ता. पूर्णा येथे दि. १७ मार्च रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर धनगर टाकळी ता. पूर्णा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातू असा परिवार आहे.

# गुढीपाडवा व नववर्ष निमित्ताने हडको येथील श्री बालाजी मंदिर येथे अभिषेकाचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– गुढीपाडवा व हिंदू नववर्षा निमित्ताने १९ मार्च रोजी हडको येथील श्री बालाजी मंदिर देवस्थान येथे सकाळी सहा वाजता अभिषेक करण्यात येणार आहे.



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवसाला पावणारा श्री बालाजी देवतेचा गुढीपाडवा व हिंदू नववर्षाच्या स्वप्नपूर्तीसाठी गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ रोजी सकाळी साडेसहा वाजता अभिषेक करण्यात येणार आहे. दिवसभर प्रसाद वाटपाचे नियोजन करण्यात आले असून, भक्तांनी अभिषेक नोंदणीसाठी मॅनेजर स्वामी मो. नं. ८८०६६ ३५१२५ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन विश्वस्त मंडळ श्री बालाजी मंदिर देवस्थान आनंद सागर सोसायटी हडको नवीन नांदेड यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क ८८०५९ २११ २६ व ९७ ३० १३ ४५ ४४ साधावा, असे कळविण्यात आले आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत लोहा येथे २९ मार्च रोजी राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशन

### माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे यांची माहिती

**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा येथे दि. २९ मार्च रोजी शिवसेनेचे मुख्यनेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशन व शिवसेना पक्ष प्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शिवसेनेचे



शेतकरी नेते माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे यांनी लोहा येथे पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी दत्ता पवार, मारोती पंढरे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष दिलीप धोंडगे, शिवराज पाटील धोंडगे, शिवसेना तालुकाप्रमुख नागोराव उमरेकर, शिवसेना तालुकाप्रमुख संतोष पाटील यंडाळे, नंदाजी इंगळे, जीवन पाटील वडजे, पिंटू माळवदे, अमण पेटकर आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे म्हणाले की, गेल्या तीन ते चार दशकांच्या वाटचालीत जे शेतकरी चळवळीतील कार्यकर्ते आहेत त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला.

या अगोदर आम्ही बीआरएसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर एमआरएसची स्थापना केली होती. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली राज्यातील अनेक कार्यकर्त्यांनी त्यांच्या सोबत काम करण्याच्या हेतूने शिवसेनेत प्रवेश केला.

शेतकरी, कष्टकरी यांच्याबाबत धडाकेबाज निर्णय घेणारे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आहेत. ते शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवू शकतात, असा विश्वास निर्माण झाल्यामुळेच उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या माध्यमातून आम्ही निश्चित बळीराजाला न्याय मिळवून देऊ शकतो. त्या अनुषंगाने दि. २९ मार्च २०२६ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली बैल बाजार मैदानात सायंकाळी ६ वाजता राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशन व शिवसेना पक्ष सोहळा होणार असून, या कार्यक्रमाला जवळपास ४० हजार शेतकरी येतील, असा विश्वास माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे यांनी व्यक्त केला.

# तलवारीने हल्ला करणाऱ्या पाच जणांना अटक; दोन तलवारी जप्त, भाग्यनगर पोलिसांची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील भाग्यनगर परिसरात एका धाब्यावर एकावर तलवारीने जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी पोलिसांनी पाच आरोपींना तत्काळ अटक केली आहे. गुन्ह्यात वापरलेल्या दोन तलवारी व तीन मोटारसायकली असा एकूण २ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १३९/२०२६ अन्वये भा.दं.वि. कलम १०९ (१), १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ११५(२), ३५२ तसेच शस्त्र कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल ढगे यांना मारहाण झाली होती. दि. १२ मार्च रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास सिग्नल चौक, शिव रोड येथे जुन्या वादातून हा हल्ला घडला. आरोपींनी तलवारी व इतर हत्यारांनी हल्ला करून एका व्यक्तीस गंभीर जखमी केले. जखमी व्यक्तीस उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले.

या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यनगरचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे, गुन्हे शोध पथकाचे पोलीस निरीक्षक महेश माळी, पोलीस उपनिरीक्षक नरेश वाडेवाले, विनोद देशमुख, पोलीस अंमलदार गजानन किडे, विष्णुकांत मुंढे, राजीव घुले, राहुल लाठकर नागनाथ चापके, विशाल माळवे, अदनान पठाण, अंकुश कांबळे यांनी तातडीने कारवाई करत पाच आरोपींना अटक केली. तसेच एका विधीसंघर्षित बालकाचाही समावेश असल्याचे समोर आले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये वैभव कोंके (वय २१), राहुल भुरारे (वय २९), योगेश भुरारे (वय २७), शुभम नायक (वय २४) आणि अनंत इंगळेदार (वय १९) आणि एक विधिसंघर्षग्रस्त बालक यांचा समावेश आहे. पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेल्या दोन तलवारी आणि तीन मोटारसायकली जप्त केल्या असून पुढील तपास सुरू आहे.

# नांदेड एक्सप्रेस हडपसरऐवजी पुणे स्थानकापर्यंत सोडण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठवाड्यातील प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन नांदेड-पुणे एक्सप्रेस हडपसर स्थानकाऐवजी पूर्वीप्रमाणेच पुणे स्थानकापर्यंत सोडावी, अशी मागणी खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

गाडी क्रमांक १७६३० हुजूर साहिब नांदेड-पुणे एक्सप्रेसला पुणे स्थानकाऐवजी हडपसरपर्यंत मर्यादित ठेवल्यामुळे निर्माण होणाऱ्या गंभीर प्रश्नाकडे खासदार रवींद्र चव्हाण यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे लक्ष वेधले.

२६ जानेवारीपासून गाडी क्र. १७६३० हुजूरसाहिब नांदेड-पुणे



एक्सप्रेस पुणे स्थानकाऐवजी हडपसर स्थानकापर्यंत मर्यादित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे नांदेड आणि मराठवाडा भागातून दररोज पुण्याला प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

ही ट्रेन पहाटे सुमारे ४:३५ वाजता हडपसर स्टेशनवर पोहोचते, परंतु त्या वेळी पीएमपीएल बस सेवा किंवा इतर सार्वजनिक वाहतूक उपलब्ध नसते. परिणामी, प्रवाशांना महागड्या रिक्षा किंवा खाजगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते, ज्यामुळे अनावश्यक आर्थिक भार पडतो. वैद्यकीय उपचारांसाठी पुण्याला प्रवास करणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, मजूर आणि रुग्णांच्या सुरक्षिततेबाबत आणि सोयीबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.

पुणे स्टेशन संकुलात ससून हॉस्पिटल, रुबी हॉल क्लिनिक आणि जहांगीर हॉस्पिटल यांसारख्या प्रमुख सरकारी आणि खाजगी वैद्यकीय संस्था आहेत. हडपसरसाठी मर्यादित सेवा असल्यामुळे गंभीर रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना एक असुरक्षित आणि खर्चिक अतिरिक्त प्रवास करावा लागतो आहे.

# अटकावून ठेवलेल्या जंगम मालमत्तेच्या विक्रीचा ई-लिलाव; तारखा जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)**– प्रादेशिक परिवहन कार्यालय, यांच्यावतीने वायुवेग पथकामार्फत प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड व इतर ठिकाणी अटकावून असलेल्या व वाहनधारकांमार्फत सोडविण्यात न आलेल्या वाहनाची ई-लिलाव प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने https://www.eauction.gov.in या संकेतस्थळावर करण्यात येणार आहे. त्याचा सांकेतांक क्रमांक 2026 MH 33493 असा आहे.

ई-लिलाव प्रक्रीयासंबंधी सविस्तर तपशील प्रक्रीया, दिनांक व वेळ पुढीलप्रमाणे आहे. ई-लिलाव ऑनलाईन/ऑफलाईन कागदपत्रे नोंदणीची सुरवात २० मार्च रोजी सकाळी ११ वा. होईल तर २७ मार्च २०२६ रोजी दुपारी १ वा. समाप्त होईल. ई-लिलाव ऑनलाईन/ऑफलाईन प्राप्त कागदपत्रे पडताळणी व मंजुरीबाबत सुरवात २० मार्च सकाळी ११ वा.तर २७ मार्च २०२६ रोजी दुपारी ५ वा. समाप्त होईल. बोलीदारांना वाहने पाहणीसाठी सुरवात २० मार्च रोजी सकाळी ११ वा. तर २७ मार्च २०२६ रोजी दुपारी ५ वा. समाप्त. ई-लिलाव ऑनलाईन लिलाव ३० मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वा. ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत राहील. यांची नोंद सर्व संबंधीतानी घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत कंकरेज यांनी केले आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com